# मैफिली आठवताना...

वि.दे. अंभईकर

जन्मदा प्रतिष्ठान, पुणे

© लेखक
वि.दे.अंभईकर, मुंबई
दूरध्वनी : ४३६३४९१

प्रकाशक
जन्मदा प्रतिष्ठान
१४९५, सदाशिव पेठ, पुणे ३०.
दूरध्वनी : ४४६०६५९

मुद्रक
प्रतिमा ऑफसेट
एरंडवणा, पुणे
दूरध्वनी : ५४६०२१६

मुखपृष्ठ
सचिन जोशी
दूरध्वनी : ४४६०६५९

मांडणी
गिरीष सहस्रबुद्धे
दूरध्वनी : ४३९१२८७

प्रथम आवृत्ती
१ मे २००२

## प्रस्तावना

मैफिली आठवताना हे नव्वदीत प्रवेश करीत असलेल्या चिरतरूण अशा श्री. विनायक देवराव अंभईकर यांचं नवं पुस्तक ! ते स्वत: उत्तम कलावंत आहेत. थोरामोठ्यांच्यासमोर त्यांनी मैफिली गाजविल्या आहेत व श्रोता या भूमिकेतून शेकडो मैफिली त्यांनी नुसत्याच ऐकल्याच आहेत असे नव्हे तर त्याच्या आठवणी त्यांच्या रोमारोमात अगदी भिनल्या आहेत. ज्या वयात स्मृती सोडून जाते अशा वयात अंभईकरांच्या आठवणी लख्ख व सुस्पष्ट आहेत. त्यांना मिळालेला आनंद होता होईल तेवढा वाचकांतही वाटून द्यावा अशा प्रेरणेने हे पुस्तक सिद्ध झालेले आहे.

संगीताच्या इतिहास लेखनामध्ये काटेकोर व अचूक नोंदी आवश्यक असतातच परंतू त्याचबरोबर स्मृतीकातर (नोस्टॅलजिक) होऊन केलेलं स्मरणरंजन सुद्धा महत्त्वाचं असतं. असं लेखन वाचकाला क्षणार्धात त्या कालखंडात घेऊन जातं व त्या थेट भूतकाळातल्या मैफिलीमध्येच नेऊन बसवतं. अशा प्रकारचा अनुभव या आठवणी वाचताना पदोपदी येतो.

गायक, ध्वनीमुद्रक व कार्यक्रम अधिकारी या नात्यानं अंभईकरांचा श्रोतो, ग्रामोफोन कंपन्या व रेडिओ केंद्राशी फार जवळून संबंध आला. साहजिकच कित्येक कलावंतांशी त्यांचे घरोब्याचे नाते निर्माण झाले. 'वंदे मातरम्' अभियानामुळे अनेक राजकीय पुढारी त्यांना जवळून पाहायला मिळले व त्यांच्यातील संगीतची जाण व आवडही अनुभवता आली.

त्यामुळेच राजकीय नेते, सनदी अधिकारी, गायक, वादक व श्रोते यांचेशी निगडीत आठवणी या पुस्तकात आहेत. सुमारे पन्नासहून अधिक मंडळींच्या मैफिली व आठवणी शब्दबद्ध केलेल्या आहेत.स्वातंत्र्यानंतर जन्माला आलेल्या पिढीमधल्या माझ्यासारखा वाचक/श्रोत्याला तर यातली कित्येक नावं ऐकून/वाचून व उपलब्ध ध्वनिमुद्रण ऐकूनच माहित आहेत. मात्र या आठवणी वाचून त्यात निश्चित भर पडेल.

अंभईकरांच्या आत्मचरित्राचं नाव 'वेचलेले संगीत मोती' असं होतं. आता 'मैफिली आठवतांना' या त्यांच्या पुस्तकात वेचलेल्या मोत्यांचा सुंदर कंठा गुंफून त्यांनी रसिक श्रोत्यांना अर्पण केलेला आहे. तो सुरेल मानून घ्यावा.

**सुरेश चांदवणकर**
कार्यवाह, सोसाय टी ऑफ इंडियन रेकॉर्ड कलेक्टर्स, मुंबई.

## मनोगत

'वन्दे मातरम्' राष्ट्रगीताचे स्वर लेखन, वेचलेले संगीत मोती, राष्ट्रसंत श्री. पाचलेगावकर महाराज यांचे चरित्र व चमत्कार ही तीन पुस्तके आजपर्यंत प्रसिद्ध झाली. आता हे चौथे पुस्तक 'मैफिली आठवतांना' प्रसिद्ध होत आहे.रसिक वाचक त्याचे स्वागत करतील अशी आशा आहे.पूर्वीच्या पुस्तकांना कै. गो. अ. तथा दादासाहेब ओगले, कै. कुसुमाग्रज तथा वि.वा. शिरवाडकर, प्रा. श्री. राम शेवाळकर, सौ. कुसुम रानडे आदि मान्यवर साहित्यिकांनी प्रस्तावनेद्वारे शुभेच्छा देऊन उपकृत केले.

आज या पुस्तकातील कलावंतांपैकी सर्वच नव्हे तर त्यातील काहींची जवळीक लाभून जो सहवास घडला व त्यात जे अनुभव आलेत्या आधारावर मी त्या कलावंताचे दर्शन वाचकांना करून देण्याचा प्रयत्न करीत आहे. कलावंतांच्या या स्वभावदर्शनात कमी अधिक उणीवा असल्यास त्यांची क्षमा मागतो. पूर्वीचे कलावंत, गुरू, शिष्य व श्रोते आणि आजचे यात फार मोठे अंतर पडले असून श्रोर्तृवर्गही पार बदलून गेला आहे. सत्तर-ऐंशी वर्षांपूर्वीचे कलावंत, त्यांच्या बैठकी, श्रोते ज्यांनी पाहिले, अनुभवले असतील ते भाग्यवान ठरले असून सर्व पिढ्या विविध प्रकारांनी रंगलेल्या आहेत. या पुस्तकाकरीता ज्यांनी मला भरपूर सहाय्य केले त्यांत श्री. मिलिंद सबनीस, श्री. भालचंद्र मेहेर, श्री. श्रीकांत पाटील (अमरावती) यांचे आभार मानण्यास खरोखर शब्द अपूरे पडतात. सोसायटी ऑफ इंडियन रेकॉर्ड कलेक्टरचे श्री. सुरेश चांदवणकर यांनीही प्रस्तावना लिहुन दिली याबद्दल आभार. याही वयात मला आणखी जे आठवेल ते भविष्यात लिहून प्रतिद्ध करण्याचा विचार आहे. श्री भगवंताची कृपा, थोरांचे आशीर्वाद, आणि रसिकांचे प्रेम असेल तरच हे कार्य पार पडेल अशी आशा व्यक्त करतो.

**वि. दे. अंभईकर**
**दादर, मुंबई**
१३ एप्रिल २००२(गुढीपाडवा)



अनेकांनी अनेक कलावंतांच्या मैफली पाहिल्या व ऐकल्या असतील आणि त्यांना निरनिराळे बरे-वाईट, चांगले अनुभवही आले असतील. माझ्या आयुष्यातही नानाविध, मनोरंजक, गंभीर, तसेच उद्‌बोधक गायन/ वादनाचे प्रसंग आले. त्यांपैकी काही रसिक वाचकांकरीता या छोट्या ग्रंथात देणार आहे. त्यात आत्मस्तुती किंवा जाहिरातबाजीही नाही, तर जे अनुभव मला येत गेले. त्याच्या आधारेच केलेला हा प्रयत्न आहे. मात्र यांतील काही आठवणी 'वेचलेले संगीत मोती', ''संत पाचलेगावरकर महाराजांचे चरित्र' या पुस्तकांतून तसेच लोकसत्ता, महाराष्ट्र टाइम्स, तरुण भारत आदी वृत्तपत्रांतून प्रसिद्ध झाल्या आहेत.

मैफली आठवताना या पुस्तकाची सुरुवात मी माझ्यापासून करतो.

१९२६ साली महात्मा गांधी नागपूरला आले होते. मी शाळेत शिकत होतो. त्या वेळचे पुढारी बॅ. मोरोपंत अभ्यंकर माझा परिचय गांधीजींशी करून देताना म्हणाले, ''ये हमारा नागपूरका लडका अच्छा गाता है !'' गांधीजींनी कुशीत बसविले. थंडीचे दिवस असल्याने त्यांनी आपली शाल माझ्या अंगावर घालून कौतुकाने म्हटले, 'गाना गाते हो ! गाओ' कोणते गाणे म्हणावे हे समजेना. शेवटी संपूर्ण 'वंदे मातरम्' गीत गायलो. त्यांना आवडले व गालावरून हात फिरवून आशीर्वाद दिला, 'अच्छा गवय्या बनो.'

## मा.कृष्णरावांची संस्मरणीय बैठक :

१९३२ साली नागपूर येथे श्रीमंत श्रीधर अण्णा तथा बाबुराव देशमुख यांच्या घरी मास्तर कृष्णरावांची अतिशय रंगलेली बैठक ऐकण्याचा सुयोग लाभला. अरुंद माडी श्रोत्यांनी गच्च भरली होती. या बैठकीचे वैशिष्टच हे की, साथीला तबल्यावर उस्ताद अहमदजान थिरकवाँ, सारंगीवर कादरबक्ष, ऑर्गनवर हरीभाऊ देशपांडे आणि तंबोऱ्यावर मी असा योग होता. मास्तरांचे गाणे सुरुवातीपासूनच रंगत गेले. रात्री १० ला 'जयतकल्याण' ने सुरुवात झाली. मास्तरांचे तरुण वय, ताना तर भिंगरीसारख्या सरसर निघत. मर्म म्हणजे ते सर्व श्रोत्यांना आपल्या बरोबर घेऊन जात व समेवर येताच 'वाहवा'ची प्रतिसाथ मिळत असे. नाट्यसंगीताने तर

वहारच केली. 'सनातन नाद हा भगवाना' हे पद उत्तम रंगले. 'चलत चलत मथुरा नगरीमें' ही बागेश्री कमालीची रंगली, तर सर्वात उत्तम 'वद जाऊ कुणाला शरण' हे पद ५५ मिनिटे गाऊन रेकॉर्ड मोडला.

एकदा घेतलेली हरकत पुन्हा आली नाही. इतके नावीन्यपूर्व पद मी आतापर्यंत ऐकले नाही. 'नायकी-कानडा' अप्रतिम रंगला. आणि 'देखो मोरी चुनरी' ही भैरवी झाली, तेव्हा पहाटेचे ४।। वाजले होते. कृष्णा मास्तरांचा आवाज 'व्याळी' जातीचा होता असे बालगंधर्व म्हणत. असाच आवाज शंकरराव सरनाईकांचा होता; पण ते एवढे चमकले नाहीत. मास्तरांनी तालीम फार केली. त्यांचे गुरू कै. भास्करबुवा बखले यांच्या बंदिशी ते अतिशय रंगवून सादर करीत.

त्या काळचे नागपुरी रसिक-श्रोतेही अघळपघळ होते. मध्यंतरात कॉफीपान यथेच्छ झाले की, मग पानसुपारीवर नजर. मांडीवर धोतराला पिवळी जर्द रामटेकची पाने पुसून चुन्याची बोटे जाजमाला किंवा बिछायतीला पुसायला कमी करीत नसत. एक बैठक ऐकली की, त्यावर उलट सुलट चर्चा होऊन ४-६ महिने तिचे पडसाद उमटत व गप्पाष्टकांत मजा येई. गाणे चालू असता मध्येच एखाद्या ओळखीच्या व्यक्तीकडे पाहून म्हणायचे की, ''काय पंत, तुमच्या मुलीचं लग्न झालं का?'' यावर 'नाही' उत्तर आल्यास ''यंदा होणार, नक्की होणारचं''आणि गाणे पुढे चालू. एकदा मास्तर गाता गाता अनेक रागांचे मिश्रण करताना हिंडोलपर्यंत पोहोचले. पुढे ध्रुपदावर लवकर येताना अडचण झाली. किंचित रागाने पण विनोदाच्या शैलीत हरीभाऊ देशपांडेंना विचारले, 'काय रे, सूर सापडत नाही? दहा वर्षं काय केलं?'

अत्रे पिक्चर्स लि.चा वसंतसेना हा बोलपट लागणार होता. त्यांचे संगीत दिग्दर्शन मा.कृष्णरावांकडे होते. त्यांना दादरला राहण्यासाठी जागा हवी होती. एक दिवस आम्ही हिंदू कॉलनीत 'टुबी लेट'ची पाटी दिसल्यावरून तेथे गेलो. घरमालकांना भेटलो. मास्तरांना काहीही न बोलण्याची आधी सूचना दिली होती तरी ऐन वेळेवर त्यांना राहवले नाही व घरमालकाला म्हणाले, 'मी गंधर्व नाटक मंडळीत काम केलेला प्रसिद्ध संगीत नट आहे.'' हे ऐकताच गुजराथी घरमालक म्हणाला, 'संगीतवाले, नाटकवाले रातभर धिंगाना करते. कव्हाबी येते कव्हाबी जाते. असा लोकांना आम्ही जागा देत नाही.' यावर मास्तर म्हणाले, 'अहो, मी त्यातला नाही. मी ब्राह्मण आहे. हे पहा जानवे.' तरी पण घरमालकाने दुर्लक्ष केले. एकदा पुण्याला संत पाचलेगावकर महाराजांबरोबर मा. कृष्णरावांसह मला बुधवार



पेठेतील पासोड्या विठोबाच्या देवळात जाण्याचा योग आला. महाराजांच्या आज्ञेवरून मास्तरांनी 'अगा वैकुंठीच्या राया...' हे पद गायले. तंबोरासुद्धा नसताना हे पद फार छान रंगले. मराठी चित्रपटसृष्टीतील संगीतात मा.कृष्णांचा जो दबदबा त्या १९४०च्या सुमारास होती. तोच दबदबा हिंदी चित्रपटसृष्टीत सैगल या नावाचा होता.

## के. एल. सैगल

या बंगाली गायकाने चंडीदास, देवदास वगैरे बोलपटांत गाणी गाऊन एके काळी श्रोत्यांवर मोहिनी टाकून आपल्या पार्श्वगायनाने वेड लावले व देशभर प्रसिद्धी मिळविली. एकदा नागपूरच्या मॉरीस कॉलेजमध्ये गॅदरिंग होते. कोणत्या तरी प्रसिध्दी गायकाला बोलाविण्याचा कार्यकारी मंडळाचा विचार चालू असता सैगल यांना बोलावण्याचे ठरले. त्याप्रमाणे गॅदरिंगचा सेक्रेटरी कलकत्त्याला जाऊन कार्यक्रम ठरवून आला. दुसऱ्या सेक्रेटरीने सुचविले की, लता मंगेशकरला बोलवावे. बंबई जाके आयेंगे ! नही आयेगी तो चलेगा, कम से कम देखके तो आयेंगे ! शेवटी सैगलचा नंबर लागला. सैगलच्या गाण्याला कॉलेजचा हॉल व बाहेरील परिसर विद्यार्थी व बाहेरून घुसलेले रसिक यांनी खच्चून भरला होता. मीपण मित्रांसह भिंतीवरून उड्या मारून कसाबसा आत शिरलो. रंगमंचावर सैगल येताच टाळ्या, शिट्या वाजवून स्वागत केले. 'मै क्या जानु', 'बालम् आये मोरे बसे मनमें !' हिंदी गीते गाऊन वन्समोअर घेतला. ४-४, ५-५ मिनिटाची गाणी गाऊन एक तासात कार्यक्रम संपविला. इतक्या लवकर गाणे संपविल्याबद्दल श्रोतृवर्ग नाराज झाला. १५-२० गाणी म्हटली तरी समाधान झाले नाही.

तेव्हा सैगल स्वतः म्हणाले, 'गानेका मेरा स्टॉक खलास हो गया ! खतम हुआ ! अब मैं नही गा सकता ! - यावर विद्यार्थी खवळले व म्हणाले, 'ऐसा कैसा हो सकता ! और गानाही चाहिये ! गोंधळ सुरू झाला. प्रिन्सिपॉल साहेबांनी शांत राहण्याचा सल्ला दिला; पण उपयोग झाला नाही. एवढ्यात दिवे गेले. मग आरडा, ओरडा, गोंधळ, धक्काबुक्की, सायकली पळविण्याचे प्रयत्न झाले.

प्रोफेसर मंडळींच्या संरक्षणात सैगल कसेबसे बाहेर पडून मुक्कामावर गेले. असा त्या काळचा असमंजस श्रोत्यांचा नमुना !

## म.अल्लादियाखाँ साहेबांचा पहाटेचा रामकली

१९४४ साल बहुधा असेल. मुंबई युनिव्हर्सिटीच्या कॉन्व्होकेशन हॉलमध्ये संगीत परिषद भरली होती. दुसरे महायुद्ध संपुष्टात आले होते. बरेच उत्साही, शौकीन पाश्चात्त्य लष्करी अधिकारी आवर्जून उपस्थित होते. आश्चर्य हे की, पं. ओंकारनाथ ठाकूर यांनी गायलेला नीलांबरी राग त्यांना फार आवडला. पंडितजींचे व्यक्तिमत्त्व, लांब केसांची वळणदार ठेवण, गाताना होत असलेले विविध पैलूंचे हावभाव आणि दोन्ही हात वर करुन मान खाली घालून स्वर लावण्याची पद्धत कोणाच्याही नजरेतून व कानातून बाहेर पडत नसे. त्यानंतर मास्तर कृष्णरावांचे गाणे झाले ते मात्र नेहमीसारखे जमले नाही.त्याला अनेक कारणे आहेत. माझ्याजवळ बसलेला एक लष्करी अधिकारी म्हणाला, "The seems to the best (म्हणजे ओंकारनाथ) though I do not follow Indian music I appreciate that one.' नंतर केसरबाई बसल्या. त्यांनी बागेश्री कानडातील 'सुखकर आई' ही चीज उत्तम रीतीने पेश केली. नंतर अल्लादियाखाँ साहेब गायला बसले तेव्हा पहाटेचे ३।। वाजले होते. तबला साथीला विष्णू शिरोडकर, सारंगीला मशीदखाँ आणि तंबोऱ्यावर फैयाजखाँ व बुर्जीखाँ आणि केसरबाई. खाँ साहेबांची ती शेवटची मैफल मला ऐकायला मिळाली आणि कान तृप्त झाले.

## विष्णुपंत पागनीस

मुंबईच्या सर कावसजी जहांगीरमध्ये तुफान गर्दी लोटली होती. ह्या वेळी



'संत तुकाराम' हा प्रभात फिल्म कंपनीचा बोलपट सर्वत्र चालू होता. खऱ्या संत तुकारामाला, गाथा लिहिणाऱ्या तुकारामाला जेवढी लोकप्रियता मिळाली नसेल, त्याच्या शेकडो पटीने तुकारामाची यशस्वी भूमिका करणाऱ्या विष्णुपंत पागनीसांना मिळाली. अगदी साधा शर्ट व धोतर नेसून स्वारी स्टेजवर येताच श्रोत्यांनी टाळ्यांच्या प्रचंड गजरात त्यांचे स्वागत केले. 'आधी बीज एकले.' हे पद ऐकताना श्रोत्यांकडून, खुर्चीवर बसलेल्या रसिकांकडून व गॅलरीत बसलेल्या श्रोत्यांकडून अक्षरशः पैशाचा पाऊस पागनीस तुकारामावर पडला.

## म. फैयाज खाँ

मरहूम खाँसाहेब फैयाज खाँ यांचे गायन ऐकायला समोरच्या रांगेत रामपूरचे नवाब, धांगध्रा संस्थानचे महाराज व युवराज बसले होते. फैयाज खाँसाहेबांना गाताना सिगारेटचे झुरके मारण्याची सवय होती. पण राजे-महाराजे यांचा मान राखावा म्हणून झुरका मारताना त्यांच्या तोंडासमोर तेवढ्यापुरता रुमाल दुसऱ्याने धरायचा हे पाहून अचंबा वाटायचा. काहींना रागही यायचा; पण गाण्यापुढे सर्व गुन्हे माफ असा तो काळ होता. 'कत्ल मुझे कर डाला रामा, पास बुलाके नजर मिलाके ! नहीं हाथमें है छुरिया ना खंजीर नहीं दिला दे भाला ! रामा, पास बुलाकर नजर मिलाके !, ही गझल गाऊन वन्समोअर घेतला. शेवटी ' खुलजा खुलजा' आणि 'बाबुल मोरा नैहर टुटों जाय' या भैरवीतल्या दोन चीजा गाऊन कार्यक्रम संपविला.

पुण्याला किर्लोस्कर थिएटरमध्ये कलावंतांचा जलसा होता. त्या वेळीही फैयाज खाँ छान गायिले. गाण्यानंतर मी खाँसाहेबांना विचारले, 'आता तुम्ही ज्या लयीत ख्याल पेश केला ती मला पसंत पडली. पण काही गायक-गायिका विलंबित लयीमध्ये ख्याल गातात ते का?, त्यावर ते म्हणाले, ' हा ज्याच्या त्याच्या गळ्याचा धर्म आहे. वास्तविक आपल्या छातीत जेवढी दमछाक आहे, तिला धरूनच ख्यालाची लय ठेवली पाहिजे.' फैयाज खाँसाहेबांचे हे म्हणणे पटण्यासारखे आहे.

## गोविंदराव टेंबे

१९२९ साली नागपूर येथे गोविंदराव टेंबे यांचा पेटीवादनाचा आणि माझा नाट्यसंगीताचा असा संयुक्त कार्यक्रम नव्यानेच बांधलेल्या सायन्स कॉलेजच्या हॉलमध्ये झाला. श्रोत्यांची गर्दी खूप होऊन रस्त्यावरही प्रेक्षक उभे होते. गोविंदरावांनी जे गाणे पेटीवर वाजविले तेच मी गायलो आणि संपूर्ण कार्यक्रम नावीन्यपूर्ण झाला. सर्वात मानापमान, स्वयंवर, एकच प्याला, संशयकल्लोळ, मूकनायक इ. नाटकांतील पदे बहारदार झाली. त्या काळी नाट्यसंगीताची आवड लोकांमध्ये विलक्षण होती. फैयाज खाँच्या अध्यक्षतेखाली गोविंदरावांचे पेटीवादन होते. 'दे हाता शरणांगता' व 'उगीच कां कांता' ही दोन पदे खूपच कौशल्याने वाजविली. मधून मधून 'वय झाले आहे, बोटे नीट चालत नाहीत,' मग गॅलरीतले प्रेक्षक ओरडतात, 'वाजविता कशाला ?' वगैरे अशी कुरकुर जरी झाली, तरी वादनात रंगच भरला होता. १९२८ मध्ये प्रथमच जेव्हा गंधर्व नाटक मंडळी अमरावतीला आली, तेव्हा मी शनिवार-रविवारची नाटके अमरावतीला जाऊन पाहून सोमवारी पुन्हा शाळेत हजर राहायचा.

## हार्मोनियमचे कौशल्य

कै. गोविंदराव टेंबे यांनी जसे पेटीवादनासह आपले अष्टपैलू संगीतमय जीवन महाराष्ट्राला दाखविले, तसे बेळगाव-धारवाडचे कै. विठ्ठलराव कोरेगावकर, पुण्याचे डॉ. पाबळकर, नागपूरचे कै. गुणवंतराव वाकेकर, अकोल्याचे श्री. शामराव बुट यांनी तसेच कै. पी. मधुकर (पेडणेकर) यांनीही पेटीवादनात अप्रतिम कौशल्य दाखविले. कै. गोविंदराव पटवर्धन यांनीही आपल्या वादनकौशल्याने श्रोत्यांना मोहून टाकले होते. तर आज अप्पा जळगावकर, पुरुषोत्तम वालावलकर, श्री. तुळशीदास बोरकर, ही त्रयी गाजत आहे. ग्यानबाबू घोषांप्रमाणे पण अत्यंत वैविध्यपूर्ण वादनकौशल्याने मुळात नागपुराचे पण आज मुंबईत स्थायिक झालेले पं. श्री. मनोहर चिमोटे हे आपल्या नावीन्यपूर्ण संवादिनी वादनाने श्रोत्यांशी गोड संवाद साधत आहेत व त्यांचे संवादिनीवादन असामान्य झाले आहे.



## म.अब्दुल करीम खाँ

खाँसाहेबांबरोबर मला ४-६ महिने राहण्याचा लाभ मिळाला. नागपूरच्या व्यंकटेश थिएटरात त्यांच्या एका कार्यक्रमाला मी तंबोऱ्यावर कंठसाथ दिली. विदर्भातील एका शहरात खाँसाहेबांचा गाण्याचा जलसा होता. कापसाचा हंगाम होता. त्यामुळे शेतीवाडी असलेल्या लोकांजवळ पैसाही भरपूर होता. मात्र गाणे जरी कळत नव्हतं तरी गर्दी केली होती. पान, तंबाखू, बिड्या, चिलीम ओढणे. तंगड्या पसरून खुर्च्या, गॅलरी, ओटा, पीट यावर बसून हे सर्व व्यवहार चालत असत. आपण गाण्याला आलो की, वेळ काढायला वा घालवायला आलो याचा त्यांना विसर पडे. अब्दुल करीम खाँ साहेबांचे गाणे सुरू होऊन १०-१५ मिनिटे झाली तरी 'वाहवा ! बहोत अच्छा !' इत्यादीचा प्रतिसाद न मिळाल्याने खाँसाहेब रागाने म्हणाले, 'ये गधेके सामने गाना फजूल है, चलो ! तंबोरा बंद करो !' आणि मॅनेजरला बोलावून त्यांना स्वच्छ मराठीत म्हणाले, 'मला तुमची बिदागी नको. सरळ स्टेशनवर जाऊन बसतो.' सारंगी, तबला, तंबोरे, पेटी, वगैरेसह आम्ही स्टेशनवर जावून बसलो. खाँसाहेबांनी अनेक आठवणी सांगितल्या, 'पिया बिन आवत नहीं चैन' ही ठुमरी, 'उगीच का कांता' हे पद, 'फगवा ब्रिज देखन को चलोरी' ही वसंत रागातील चीज, 'वद जाऊ कुणाला शरण' ही पदे मोठ्या गमतीने हलक्या आवाजात गाऊन दाखविली. कोणत्या ओळींना ठेका, दुगुन, लहान परण कशी असावीत हेही सांगितले. शोध, बोध, विनोद व संगीत या सर्व दृष्टीने हा दौरा माझ्या आयुष्यात उपयुक्त ठरला.

## म. निस्सार हुसेन खाँ

मिशीवर पीळ देत, हातातील छोटी छडी फिरवत, एकटाच उभा असलेला हा कलाकार कोण असावा, असे विचार मनात आले. पण प्रो. बी. आर. देवधर म्हणाले, 'जाऊ द्या उजेडात पाहिल्याशिवाय ओळखता येणार नाही, एवढ्यात मी उठून ह्या व्यक्ती च्या जवळ गेलो व 'आप अकेले खडे क्यों ? आपका नाम ?' विचारले, यावर ते म्हणाले, 'मी निस्सार हुसेन खाँ.' नंतर त्यांना हात धरून आमच्या

कंपूत आणले. कुमार गंधर्व, नारायणराव व्यास, देवधर, विनायकबुवा पटवर्धन वगैरे आम्ही शेंगदाणे खात बसलो होतो. १९३८ साली अलाहाबादची संगीत परिषदेतील ही घटना. खाँ साहेबांची व माझीही छान ओळख झाली. संगीत परिषद आटोपल्यावर सगळे आपापल्या गावी रवाना झाले. मी व निस्सार हुसेन नागपूरला आलो. सीताबर्डीवरील एका गल्लीत जुनाट घरात ते उतरले. शिरा, पोहे, चहा यावर यथेच्छ ताव मारला. त्यांना आंब्याचे लोणचे फार आवडले. माझी आई म्हणाली, 'खाँसाहेब ! रात्री तुम्हांला गायचे आहे, आंबट लोणचे खाऊ नका.' रात्री गाणे संपल्यावर सकाळी खाँसाहेब घरी आले व आईला म्हणाले, 'माताजी, तुमच्या लोणच्याने माझा आवाज चांगला लागला. एका बाटलीत माझ्या घरच्यांकरिता हे लोणचे देता काय ?' त्याप्रमाणे आईने त्यांना दिले. त्यांना खूप आनंद झाला. रात्री कार्यक्रम चांगला झाला. पहाटेचा तोडी राग व तराणा अजूनही कानात घुमतोय ! निस्सार हुसेन खाँ साहेबांचे जावई, श्री हाफिज अहमद हे माझ्या बरोबर मुंबई आकाशवाणीवर होते. गप्पा मारताना ते लोणच्याची गंमत नेहमी सांगत.

## तालाशी झगडणारे पं. गजाननराव जोशी

मुंबई आकाशवाणीच्या सेवेत असताना गजाननरावांचे वादनकौशल्याचे तसेच गायनकौशल्याचे विविध पैलू पाहायला मिळाले. १९५६ मध्ये केंद्रीय नभोवाणी मंत्री डॉ. बाळकृष्ण केसकर यांच्या उपस्थितीत भारतीय विद्या भवनाच्या प्रशस्त आणि निमंत्रितांनी भरलेल्या सभागृहात त्यांच्या व्हायोलीन वादनाचा कार्यक्रम झाला. त्याचे वैशिष्ट्य ती म्हणजे ती जुगलबंदी नसून त्रिगलबंदी ती होती. कायदेनवाझ तिरखवाँ डावीकडे आणि पं. सामताप्रसाद उजवीकडे आणि मध्यभागी गजाननबुवा जोशी व्हायोलीनवर. शेकडो कार्यक्रम मी हिंदुस्थानभर पाहिले. अविस्मरणीय ठरलेल्या कार्यक्रमांत बुवांच्या या कार्यक्रमाचा क्रम वरचा ठरतो. पं. सामताप्रसाद या बनारसी वादकाने तर कमाल केली. पंजाब मेल, तुफान एक्स्प्रेस, मालगाडी हे स्वरचित प्रकार वाजविले. मात्र हिंदुस्थानातील प्रसिद्ध घराण्यांचे बाज दाखविण्यास कमी केले नाही. उस्ताद तिरखवाँ साहेबांनीसुद्धा तबल्यातील सर्व कायदे अत्यंत






कौशल्यपूर्वक वाजवून विक्रम मोडला. मात्र या दोन्ही वस्तादांना गजाननबुवा पुरून उरले. यापेक्षा अधिक वर्णन करायला शब्द नाहीत. कार्यक्रमाच्या शेवटी पडद्यामागे जाऊन तिघांचे अभिनंदन केले, तेव्हा सामताप्रसादजींनी अंगातील शर्ट काढून तांब्याभर घाम पिळून काढला.

## दक्षिणेत अनामलाई युनिव्हर्सिटीतील कार्यक्रम

मद्रासला हिंदी प्रसार सभा व गोखले हॉलमधील कार्यक्रम आटोपून मी कुंभकोणम येथे त्यागराज स्वामींच्या उत्सवाकरिता रवाना झालो. तुकाराम महाराजांप्रमाणेच दक्षिणेत त्यागराज स्वामी होऊन गेले. हत्तीवरून त्यांच्या प्रतिमेची वाजत गाजत मिरवणूक काढली होती. नागस्वरम वाजविणारे प्रसिद्ध चावडिय्यासह इतर कलावंतांनीही भाग घेतला होता. रात्री झालेल्या संगीत समारोहात मी एकटाच हिंदुस्थानी शास्त्रीय गायक होतो. माझी रागदारी पसंत पडून अनामलाई युनिव्हर्सिटीच्या संगीत विभागाचे प्रमुख डॉ. टी. वरदाचारी यांनी मला चिदंबरम येथे कार्यक्रमासाठी आपल्या बरोबर नेले. अनामलाई विश्वविद्यालयाचा प्रशस्त हॉल, विद्यार्थी व इतर पाहुण्यांनी भरला होता. मल्हार गात असताना बाहेर पाऊस सुरू झाला. टाळ्यांनी स्वागत करण्यात आले. प्रमुख टी. वरदाचारींनी माझा संस्कृतमध्ये परिचय करून दिला आणि गाणे आवडल्याचे प्रतिक म्हणून माझे चुंबन घेतले. टाळ्यांचा कडकडाट व बाहेर मेघगर्जना चालू होती. असा योगायोग आला. टायगर वरदाचारी यांच्या घरी झालेल्या १५-२० अस्सल श्रोत्यांच्या उपस्थितीत सकाळच्या रागांचा कार्यक्रम झाला. त्यात हिंडौल, भैरवी, तोडी इत्यादी रागांची कर्नाटक संगीतातली नावे एका प्राध्यापकाने समजून सांगितली व प्रात्यक्षिके चार तंबोरे व मृदंगमच्या साथीत झाली. सांस्कृतिक देवाण-घेवाणीचाच हा भाग समजायचा. दाक्षिणात्य संगीत आज बरेच पुढे गेले असून त्यातही अनेक सुधारणा झाल्या आहेत.

## संगीतातील औरंगजेब

मद्रासच्या गोखले हॉलमध्ये निमंत्रितांनी गर्दी केली होती. धूप, अत्तर, केळीचे खांब, ध्वज, तोरणे, रोषणाई यांनी शोभा आणली होती. समोरच एम. एस. सुब्बालक्ष्मी, चावडीय्या, प्रो.अद्यंथय्या, डॉ.टी. रामाराव, घटमवादक चिक्कू आदि मान्यवर कलावंत उपस्थित होते. सर्वत्र संगीतमय वातावरण होते. इतक्यांत अध्यक्ष सर सी.पी.रामस्वामी अय्यर यांचे आगमन झाले. सेक्रेटरींनी परिचय वगैरे औपचारिक रीतिरिवाज करून दिल्यानंतर २-३ मिनिटेच त्यांनी भाषण केले. "The persons who had come to me, for invitation knew well that I do not know anything about south & north Indian music. But I was forced to come to attend this function. Sorry I take your leave.' असे म्हणून खुर्चीवरून खाली उतरले आणि श्रोत्यांत एकदम कुजबुज सुरू झाली. नंतर एका मान्यवरांनी अध्यक्षस्थान स्वीकारले आणि वेळ निभावून नेली. या वेळी पं. नेहरूंची आठवण झाली. कोणताही विषय असो, चार शब्द बोलल्याशिवाय ते राहत नसत.



## विसाव्या शतकातील संत भीमसेन :

पंडितजींवर कितीही लिहिले तरी ते कमीच. सुंदराबाई हॉलमध्ये त्यांचा सकाळच्या रागांचा कार्यक्रम ऐकला. ललत पंचम केवळ अप्रतिम झाला. भैरवीने कार्यक्रम संपला. तबल्यावर नाना मुळे व पेटीवर अप्पा जळगावकर! मात्र अभंगवाणीतील काही अभंग ऐकताना श्रोते इतके तल्लीन होत की, गायकाबरोबर त्यांचेही देहभान हरपल्याचा भास होतो. एकदा तर मी त्यांना म्हणालो की, 'जोशीबुवा, तुमचं गाणं म्हणजे संगीताची जिवंत समाधीच. 'चालता-बोलता न हाले समाधी,' या संत महात्म्यांच्या वचनात थोडा बदल करून असे म्हणावेसे वाटते की, 'चालता-बोलता न संपावे हे गाणे !' अभंगवाणी ऐकताना भक्त सुरदास, संत मीराबाई, तुकाराम, एकनाथ, आदी संतांची आठवण झाल्याशिवाय राहत नाही. तर तुमच्या गाण्याची रंगत. ठेव, अर्थ, गांभीर्य, माधुर्य सतत कानात घुमत राहते. नाटक चालू असताना बालगंधर्व गाताना थांबले तरी सारंगी, पायपेटी, तबला चालूच



राहतो, आणि गंधर्व गात असल्याचा प्रत्यक्ष भास होतो. तसा तुम्ही अभंग गात असताना मध्ये थांबलात तरी पेटी, मृदुंगाच्या साथीत तुमची अभंगवाणी चालूच राहात असल्याचा प्रत्यक्ष भास होतो आणि श्रोते अगदी स्वर्गीय स्वरानंदात तल्लीन होतात. श्रवणभक्तीची देणगी तुम्ही श्रोत्यांना देऊन मोठेच पुण्यकर्म करीत आहात, म्हणून भीमसेनजींना विसाव्या शतकातील संत भीमसेन म्हटल्यास अतिशयोक्ती वाटू नये.

वयोमान-परत्वे पूर्वीचा जोम जरी कमी झाला असला, तरी पूर्वीच्या जबरदस्त घेतलेल्या तालमीचे पडसाद काही वेळा पुरेपुरपणे जाणवतात. काही दिवसांपूर्वी मी त्यांचा दरबारी कानडा ऐकला. मी त्यांना म्हटले, 'बुवा, तुमचा खरा दरबारी ३० वर्षांपूर्वी एका बैठकीत गायलेला कॅसेटवर ऐकला. गाण्याचे परमभक्त श्री. बाळासाहेब बाक्रे यांच्या स्टॉकमध्ये जपून ठेवलेला; मी अनेक कलावंतांकडून गायला गेलेला दरबारी ऐकला, पण ३० वर्षांपूर्वीच्या ह्या दरबारीला तोड नाही. ही कॅसेट कितीही वेळा ऐकली तरी त्याची गोडी अगदी एव्हरलास्टिंग आहे. तिन्ही सप्तकांतील ताना व तार सप्तकातील अगदी वरच्या षड्जापर्यंत तितक्याच सफाईने व दमछाटीने इतर कोणी गायला असल्यास माहीत नाही; परंतु ऐकताना पदोपदी जाणीव होते की, काय जबरदस्त तालीम पूर्वी घेतली असेल. पाश्चात्त्य देशातही जोशीबुवांच्या शास्त्रीय संगीताने मोहिनी घातली असून गर्दी करणाऱ्यांत काही श्रोते अर्थ, स्वर, माधुर्य, ताल, लय यांचा अभ्यास करताना दिसतात.

(पं.भीमसेन जोशी) बुवांची एकही बैठक कधी रंगली नाही असे कधी पाहिले वा ऐकले नाही. एच. एम. व्ही. मध्ये मी असता जोशीबुवांची अनेक कानडी व मराठी पदे ध्वनिमुद्रित केली होती. पुढे तर मर्यादेपलीकडे जाऊन त्यांनी आपल्या गानकौशल्यावर जगभर लोकप्रियता मिळविली. पु. ल. गमतीने त्यांना हवाई-गंधर्व म्हणत असत. यमनपासून भैरवीपर्यंत त्यांची विलक्षण पकड होती. एका जर्मन प्रोड्युसरने तर बुवांचा तोडी राग पसंत करून त्याच रागाचे ध्वनिमुद्रण करून बरोबर नेले. श्रीमती लता मंगेशकर व जोशी बुवा यांच्या एकत्रित भक्तिगायनाने तर सुगम संगीत क्षेत्रात नवीन पायंडा पडला. भीमसेनजींची अभंगवाणी घराघरातून ऐकायला येते व खऱ्या अर्थाने अभंगच राहिली. तबला, मृदुंग, पखवाज, मंजिरी (टाळ) या अभंगवाणीचे साथीदार आहेत.



## पं. व्ही. जी. जोग यांचे व्हायोलीन

साठ वर्षांच्या घनिष्ट स्नेहसंबंधामुळे श्री. बंडोपंत जोग यांचे अनेक कार्यक्रम ऐकायला मिळाले. याशिवाय मुंबई आकाशवाणीवर आमचे खूपच जमले होते. फावल्या वेळात स्टुडिओत जाऊन विविध रागांचे प्रकार, तिन्ही सप्तकांत बोटे फिरताना कौशल्य जाणवत होते. माझ्या काही कार्यक्रमांना त्यांनी साथही केली होती. अलाहाबाद, मुंबई, नागपूर, येथील संगीत परिषदांत त्यांचे व्हायोलीन चांगलेच गाजले होते. जोग यांचे व्हायोलीन व बिस्मिल्लाखान यांची शहनाई यांची जुगलबंदी पं. सामताप्रसाद यांच्या तबल्यासह रंगलेली ऐकायला मिळाली. नेहमी प्रसन्न, आनंदी व विनोदी स्वभावामुळे ते अधिक लोकप्रिय झाले. अतिद्रुत लयीत फिरताना तार सप्तकातील वरचा षडज् लावताना व ताना फिरविताना जादूसारखी त्यांची बोटे फिरत व श्रोत्यांकडून टाळ्यांचा कडकडाट होई. तबल्याच्या साथीदारांमध्ये भारतातील बहुतेक तबलजींची साथ त्यांना लाभल्यामुळे ताल, लय, सूर यावर कमालीचा ताबा होता. जुन्या जमान्यातील तबलजी विष्णू शिरोडकर, शमसुद्दीन खाँ, सामताप्रसाद, अल्लारखाँ उस्ताद तिरखवाँ ते आताच्या सपन चौधरी, उस्ताद झाकीर हुसेनपर्यंत नावे घेतली की, त्यांच्या वादनकौशल्याची अधिक तारीफ करण्याची गरज नाही.

## पं. कृष्णराव पंडित

मुंबईला राज्य संगीत महोत्सव आयेजित केला होता. त्या प्रसंगी धोबी तलावाच्या भव्य प्रांगणात रसिकांची गर्दी झाली होती. रंगमंचाच्या अगदी पुढच्या गादीच्या बैठकीवर बडे गुलाम अली खान, गजाननराव जोशी, व्ही. जी. जोग, पु. ल. देशपांडे आम्ही सर्वजण दाटीने एकमेकांना चिकटून बसलो होतो. पंडितजींनी टप्पा व ख्याल अत्यंत कौशल्याने पेश केले व मैफल रंगतदार वळणावर संपली. चहापानाच्या वेळी पु.लं.चा विनोदाचा सर लागला व म्हणाले, 'भिंगरी तान, बकरी तान, बोकडतान आणि ओकारी हे तानांचे प्रकार एखाद्याच गवय्याच्या बंदिशीत असतात. तानसेनाच्या बापालाही हे प्रकार माहीत नसतील' आणि हास्यकल्लोळात



जर कोणी खूप हसले असतील तर तिरखवाँ साहेब! हसता हसता तोंडातील चहा गुळणीच्या रूपाने बाहेर पडला. यावर पु. ल. लागलीच म्हणाले, ' हा, 'गुळणी तानेचा' प्रकार समजायचा काय?' प्रचंड हशा.

## प्रो. राजाभैय्या पूँछवाले

टप्पा कसा गावा ते खरे तर पं. राजाभैय्यांकडूनच शिकावे. अनेक रागांतील टप्पे मी शिकलो; परंतु त्यांनी मला एकच सल्ला दिला की, 'टप्पा गायचा असेल तर छातीत पूर्ण दमछाट हवी. लय कायम ठेवून कुशलतेने समेवर येणे अवघड आहे. तू अशक्त आहेस. पुढे तुझ्या गाण्याचे कार्यक्रम होतील, त्यात टप्पा सहसा गाण्याचा प्रयत्न करू नकोस. गाण्याची परीक्षा त्यांनी घेतली. त्यानंतर काफी रागातील 'हो माई जाने दे' हा टप्पा इतका छान रंगला की, अजूनही तो स्पष्टपणे जाणवतो, आठवतो.

## पं. रविशंकर

आंतरराष्ट्रीय स्तरावर भारतीय शास्त्रीय संगीताचा सर्वाधिक प्रसार कोणी केला असेल तर सुप्रसिद्ध सतारवादक पं. रविशंकर यांचे नाव घ्यावे लागेल. ५०-६० वर्षांपासूनची ओळख कायम आहे. एच.एम.व्ही. ग्रामोफोन कंपनीत असताना कलकत्त्याहून मुंबईत आले. रिकामा असेल त्या स्टुडिओत वा खोलीत रियाज करायला ते बसत असत. दुपारी १२ ला सतार मांडीवर घेऊन बसले की, ४-५ वाजेपर्यंत बैठक मोडत नसत. चहाचा, जेवणाचा आग्रह केला तर म्हणायचे, 'वो सब रियाज के बाद लेंगे' आणि संपल्यावर आम्ही फिरोजशहा मेहता रोडवरील समोरच असलेल्या ब्रिस्टॉल ग्रील या हॉटेलात चहा वगैरे घेत असू. हंसध्वनी हा राग सतत तीन दिवस ऐकायला मिळाला. आणि खरी तालीम कशी असावी याचे धडे पं. रविशंकरकडून मिळाले. सतारवादनात अनेक आकर्षक प्रकार शास्त्रीय

रागदारीला धरूनच त्यांनी बसविले. त्यांची श्रवणशक्ती, दुसऱ्याकडूनही काही शिकण्याची प्रवृत्ती याचा त्यांना फायदाच झाला. पंडितजींचे अनेक कार्यक्रम ऐकले; परंतु १९७४ साली स्वरसाधना या संस्थेतर्फे अमरावतीला झालेला कार्यक्रम संस्मरणीय ठरावा असा झाला. बऱ्याच दिवसांनंतर भेट झाली याचा आनंद आम्हां दोघांनाही झाला. कार्यक्रम रात्रौ १०-१०.३० ला सुरू झाला. तो पहाटे ४।। पर्यंत रंगला. अनेक राग त्यांनी वाजविले; पण माझ्या आग्रहाखातर हंसध्वनी वाजविल्यामुळे पूर्वीच्या स्मृतींना उजाळा मिळाला. मध्ये एक धून अशी वाजविली की, त्यात जपानी, इन्डोनेशियन, रशियन, लोकगीतांच्या स्वरांचे प्रकार दाखवून पुन्हा हिंदुस्थानी शास्त्रीय संगीताच्या मुळ अधिष्ठानावर मोठ्या कौशल्याने येत. काही तरी नवीन आहे या समजुतीने कान लांब करून श्रोते आस्वाद घेत होते. मध्यंतरात भेटताच जुन्या आठवणींना ऊत आला. माझे दात पडल्यामुळे पंडितजी म्हणाले, 'ताबडतोब दात बसवून घ्या म्हणजे सारेगम, तराना गाताना अडचण येणार नाही.'

पुण्याच्या बी. जे. मेडिकल कॉलेजच्या म्युझिक क्लबमध्ये पंडितजींचा कार्यक्रम होता. पाऊण तास सुरुवातीचा आलाप, गात, झाला ऐकून श्रोते कंटाळलेले दिसले तेव्हा अल्लारखाँ साहेबांना मी खूण केली. चाणाक्ष पंडितजींच्या लक्षात हे येताच अल्लारखाँनी अस्तन्या नुसत्या वर केल्या आणि टाळ्यांचा कडकडाट झाला. श्रोत्यांची कुजबूज थांबली आणि ते दरबारी कानडा ऐकण्यात रंगून गेले. खऱ्या संगीताची मेजवानी घ्यायची असेल तर अल्लारखाँ साहेबांच्या तबल्याच्या साथीत पंडितजींचा कार्यक्रम ऐकावा. तबल्याचे काही प्रमुख बाज पलटे, तुकडे, पराणे सहीसही सतारीतून काढण्याचे कौशल्य त्यांच्या बोटांमध्ये होते. अमेरिकेतील श्रोते पंडितजींच्या व तबलजीच्या बोटात काय जादू आहे हे मोठ्या उत्सुकतेने पाहतात. असे ऐकिवात आहे की, लंडनच्या ब्रॉडवे हॉलमध्ये जेव्हा पहिला कार्यक्रम झाला, तेव्हा रात्रौ ९।। ला सुरू होणारा कार्यक्रम ५ मि. कमी असताना हॉल रिकामाच दिसला. पंडितजींना वाटले, अजून प्रेक्षक कोणीच कसे आले नाहीत? त्यांना चिंता वाटली. पण ४-५ मिनिटांत पाखराप्रमाणे येऊन हॉल श्रोत्यांनी भरून 'हाऊस फुल्ल'ची पाटी लागली. कोणी तरी त्यांना म्हटले की, 'धिस इज नॉट इंडिया' बरोबर ९।। ला पडदा बाजूला सरकला आणि जगप्रसिद्ध व्हायोलीन वादक यहुदी मेनुहीनने पंडितजींचा हात धरून रंगमंचावर प्रवेश केला आणि टाळ्यांचा प्रचंड गजर झाला.



पंडितजींच्या कार्यक्रमाची कॅसेटस, टी.व्ही. वगैरे साधनाद्वारे जगभर प्रसिद्धी झाली. जास्तीत जास्त वेळ रियाजासाठी खर्च केला पाहिजे. दुप्पट, तिप्पट, चौपट करून यशस्वीपणे तिय्ये घेऊन समेवर आले पाहिजे. खर्जातील मींडकाम एका छेडल्यावरच दाखविण्याचा प्रयत्न केला पाहिजे. सुरुवातीला गत, तोडा झाला, वगैरे थोडक्यातच आटोपून चीजेला वा बंदिशीला सुरूवात व्हायला पाहिजे. तबल्याचे व सतारीचे बोल यांचा कौशल्याने मेळ घालणे जमले पाहिजे. मरहूम इनायतखाँ सतारीये यांचे मींडकाम व आजचे उस्ताद अब्दुल हलीम जाफरखाँ यांचे मींडकाम अभ्यासाकरिता उपयोगी आहे. मात्र पं. रविशंकर यांनी जगभर भारतीय शास्त्रीय संगीताचा प्रचंड प्रसार करून आंतरराष्ट्रीय लोकप्रियता मिळविली आणि अत्युच्च पुरस्कारांचे मानकरी ठरले. पाश्चात्त्य व पौर्वात्य संगीताचा मेळ घालून काही रचना वाद्यवृन्दावर वाजवून जगभरातील सुप्रसिद्ध आणि कर्तृत्ववान कंपोजर-कंडक्टर यांनीही मान्यता, प्रशंसा व कौतुक केले. 'कम सप्टेंबर' या इंग्रजी बोलपटालाही संगीत दिले आहे. 'मीरा' या हिंदी बोलपटालाही कौशल्यपूर्ण संगीत दिले. एवढ्या उतारवयातही पंडितजींचे संगीत रचनांचे नवनवीन प्रयोग मात्र चालूच आहेत हे विशेष. वेदशास्त्र पंडितांनी अनेक भाष्ये आतापर्यंत ध्वनिमुद्रित केली आहेत. पण पं. रविशंकर यांनी भारतीय वाद्यांच्या सहाय्याने सुप्रसिद्ध संगीतकार जॉर्ज हॅरिसन यांच्या मदतीने वेदातील काही संस्कृत रचना सतारीवर वीणा, बासरी, तंबोरा, तबला आदि वाद्यांच्या साहाय्याने ध्वनिमुद्रित केली आहेत. वाद्यसंगीताद्वारे सर्व जगाला संस्कृतमध्ये शांतिसंदेश देण्याच्या या उपक्रमाचे प्रशंसनीय महत्त्व आहे. शेवटी असे म्हणावेसे वाटते की, पाश्चात्त्य व पौर्वात्य संगीताच्या माध्यमातून विश्वशांतीचा संदेश देण्याचा यशस्वी प्रयत्न करीत असल्याबद्दल नोबेल पारितोषिकाचे मानकरी ठरावयास हवेत. याबरोबर हेही खरे की, जरी हे पारितोषिक मिळाले नाही तरी त्यांचे संगीत प्रयोग चालूच राहतील.

## पं. ओंकारनाथ ठाकुर

भारदस्त आवाज आणि नेत्रदीपक व्यक्तिमत्त्व लाभलेल्या पं. ओंकारनाथ

या गानमहर्षी पं. विष्णू दिगंबर पलुस्कर यांच्या, शिष्याने एक काळ खूपच गाजविला. एच.एम.व्ही. मध्ये मी असताना त्यांच्या ध्वनिमुद्रिका काढण्याचा योग आला. त्यापूर्वी म्हणजे १० वर्षांपूर्वी १९३३ साली माझा त्यांचा परिचय झाला. ह्यापूर्वी गिरगावातील काँग्रेस हाऊसच्या जीना हॉलमध्ये संगीत परिषद भरली असता सकाळच्या बैठकीत हिराबाई बडोदेकर, वझेबुवा, पं. ओंकारनाथ आणि मी असा कार्यक्रम होता. मी प्रथमच नागपूरहून मुंबईच्या संगीत परिषदेत गायला आल्यामुळे सर्वांचे लक्ष लागले होते. मी हिंडोल राग गायलो आणि पंडितजींनी माझा हात धरून शाबासकी दिली. एवढ्या मोठ्या गायकाने दिलेली शाबासकी ही पावतीच समजून मला आनंदाचे भरते आले. त्यांनी मला घरी आग्रहाने बोलाविले. मी जेव्हा घरी गेलो तेव्हा झोपाळ्यात बसून ते गुणगुणत होते. परवा गायिलेला हिंडोल मला पुन्हा ऐकायचा आहे असे म्हणताच तंबोरा आणला. पांढरी चारमध्ये त्या वेळी मी गात होतो. हिंडोल रागाचे आणखी प्रकार त्यांनी ऐकविले. त्यांचा निलांबरी, हिंडोल आणि वंदे मातरम् तर प्रसिद्धच आहे. या ध्वनिमुद्रिका कोलंबिया या हिरव्या रंगाच्या लेबलच्या आहेत.

## बालगंधर्व

पूर्वी संगीत नाटकाला फार महत्त्व होते. 'येणार! येणार! येणार! व आपले लोकप्रिय खेळ सुरू करणार!' अशा गावात जाहिराती झळकत. १९२८ साली गंधर्व संगीत नाटक मंडळी प्रथमच विदर्भात अमरावतीला आली. गणेश थिएटरात ही नाटके होत असत. माझे थोरले बंधू दादासाहेब कॅम्पवर पोस्टमास्तर होते. आधीच शनिवार-रविवारची नाटकांची तिकिटे काढून ठेवत. 'स्वयंवर' नाटकातील 'नरवर कृष्णा समान' या गाण्याला सात वन्समोअर्स घेतलेले मी पाहिले व कान तृप्त झाले. बालगंधर्वाचे गाणे बैठकीपेक्षा नाटकात रंगभूमीवर ऐकणे पसंत लोक करीत असत. एकदा खामगाव (विदर्भ) येथे संत पाचलेगावकर महाराजांच्या मुक्तेश्वर आश्रमात त्यांच्या गाण्याचा छोटासा कार्यक्रम घडवून आणला. तेव्हा गोहरबाई म्हणाल्या



की, 'मी आले तर चालेल काय? कारण महाराजांचे देऊळ आहे'. मी म्हटले 'शंकराला गाणे प्रिय होते. संगीतात जाती-भेदभाव कधीच नसतो. तुम्ही खुशाल या'. बाईंना खूप आनंद झाला. गंधर्व म्हणाले, 'देवा, तुम्हीच पेटीची साथ करा.' नेहमी गोहरबाई वाजवितात, म्हणून मी त्यांच्याकडे पाहिले. त्या म्हणाल्या, 'नानांची इच्छा आहे तर तुम्ही वाजवा'. 'अवघाची संसार सुखाचा करीन' हे पद नारायणरावांनी गाऊन बहार केली. महाराज म्हणाले, 'नरवर कृष्णा समान' हे पद गाल काय?, यावर ते म्हणाले, 'जशी आपली आज्ञा!' आणि खरोखरच ते तल्लीन होऊन गाणे म्हणू लागले. महाराजांनीही कौतुक केले. शेवटी गोहरबाईंनी ज्ञानेश्वरांचे 'समाधीसाधन' हे पद गाऊन हा गोड कार्यक्रम संपला. महाराजांनी बालगंधर्वांना श्रीफळ, शाल देऊन आशीर्वाद दिला. 'मजला घडावी ही सेवा' हे पदही महाराजांना फार पसंत पडले.

बालगंधर्वांच्या गाण्याचे वैशिष्ट्य हे की, गाताना आपल्या भूमिकेशी एकरूप होऊन एकदम गानसमाधी लागत असे. मला अनेकदा त्यांचे रेकार्डिंग करण्याचे प्रसंग आले. मुंबई आकाशवाणीच्या सेवेत मी असताना एकदा तर त्यांची कवळी पडली तरी गाणे सुरूच होते, चालूच होते. एकदा रेकार्डिंग सुरू असताना रिषभ कोमल लागला. तेव्हा खांद्याला हात लावून म्हटले, 'नाना, सर्व गाणे छान झाले. पण शेवटी (रिषभ) रे कोमल लागला'. यावर ते म्हणाले, ' इथं कोणा लेकाला कोमल शुद्धबिद्ध कळतेय. द्या वन्समोअर! घ्या रिटेक!' कित्येकदा अशा विनोदामुळे कार्यक्रमाला रंगत चढे.

## पं. मल्लिकार्जून मन्सूर

नागपूरला एका कॉलेजच्या संमेलनात मन्सूरजींचे गायन होते. अर्थात उच्च दर्जाचे गायक असल्याने गाणे चांगलेच झाले. पण विद्यार्थी वर्गाला विशेष पसंत पडले नाही. दुसरे दिवशी आमचे घरी मन्सुरजी चहाला आले. चहा गप्पा करता करता मला म्हणाले, 'तुम्हीही गाता असे ऐकले. गाता का एखादी चीज?' मी तंबोरा काढला व त्यांचीच रेकॉर्ड असलेली काफी रागातील 'बरकत वालियो

ठाडो' ही चीज गायलो. ती कशी गावी, काय सुधारणा हवी हे त्यांनी गाऊन दाखविले. सकाळी १०।। ला सुरू केलेली काफी रागातील चीज १२ वाजता संपविली. तबला नव्हता तरी सर्व आलाप, ताना, स्वरविस्तार करताना उणीव भासू दिली नाही. एवढ्या मोठ्या गायकाचे गाणे घरबसल्या ऐकायला मिळाल्याचा परमानंद झाला. १५-२० वर्षांपूर्वी त्यांच्या पंचाहत्तरीनिमित्त झालेल्या कार्यक्रमात सर्वश्री. पु. ल. देशपांडे, पं. रविशंकर यांची गौरवपर भाषणे झाली व आठवणी सांगितल्या. बिहागडा, बहादुरी तोडी, नंद, खोकर हे राग ते फार चांगल्या रीतीने गात असल्याचे आवर्जून सांगितले.

## श्रीमती गंगुबाई हनगल (गांधारी)

माझ्या आठवणीप्रमाणे श्रीमती गंगुबाईचे गाणे प्रथम मुंबईला मुगभाटात असलेल्या ट्रिनिटी क्लबमध्ये ऐकले. हा क्लब म्हणजे कलावंतांचे माहेरघरच होते. सवाई गंधर्व, प्रो. देवधर, राजारामबुवा पराडकर, गोविंदराव टेंबे, कृष्णराव चोणकर आदी कलावंतांची हजेरी लागे आणि संगीतावर गप्पा व आठवणींना भरती येई व सर्व वातावरण संगीतमय होई. गंगुबाईंच्या गाण्यावर सवाई गंधर्वांची पूर्ण छाप असून भारदस्त आवाज, विलंबित ख्यालाचे प्रकार, गायकी आलाप-ताना यांमुळे बैठक रंगत असे. 'आईचा छकुला चिमुकला' हे मराठी पद बाई कानडी असूनही कुशलतेने स्वच्छ आवाजात गात, ते एच. एम. व्ही. ने ध्वनिमुद्रित केले. पं. भीमसेन जोशी, गंगुबाई आणि मल्लिकार्जून मन्सूर हे तिघेही कानडी असले तरी या सर्वांत भीमसेनजींच्या गाण्यावर मराठीचा शुद्ध प्रभाव होता.

## हिराबाई बडोदेकर

सवाई गंधर्व व अब्दूल करीमखाँ यांची पूर्ण छाप असलेल्या हिराबाई षड्ज पंचम गंधार घेऊनच जन्मल्या असाव्यात असे वाटते. मी इतके कार्यक्रम ऐकले. त्यांचे ध्वनिमुद्रण केले; पण कधीही त्या बेसूर झाल्याचे ऐकले नाही. त्या





काळी लाऊड स्पीकर्स नव्हते. तरी 'टाचणी शांततेत' त्यांचा प्रत्येक स्वर हृदयाचा ठाव घेऊन जाई. ''नंदलाला नाचरे ब्रिजलाला'' या श्री. सुधीर फडके यांच्या चालीवर, ध्वनिमुद्रण होण्याच्या वेळी आठ दिवस आम्ही त्यांच्या घरी रिहर्सल्सला जाण्याचा योग आला. फडके साहेबांच्या चाली म्हणजे खेळ नव्हे. स्वर, अर्थ, उच्चार, अगदी पूर्ण समाधान होईपर्यंत शेकडो वेळा गाण्याच्या रिहर्सल्स ते घेत असत. इकडचे तिकडे जरासुद्धा कमी-जास्त झालेले त्यांना खपत नसल्यामुळे ते सांगतील तसेच, तडजोड न करता गायले पाहिजे असा त्यांचा आग्रह असे, त्यामुळे गाणीही दोषमुक्त असत. सारंगीवर बाबुराव कुमठेकर व तबल्यावर शमसुद्दीनखाँ ही जोडी खूप दिवस टिकली.

## श्री. सुधीर फडके

ग. दि. माडगूळकर रचित गीतरामायणाने व बोलपटातील गाण्यांमुळे सर्व महाराष्ट्राला ज्यांनी वेड लावले ते गायक नि संगीत दिग्दर्शक श्री. सुधीर फडके यांच्यावर कितीही लिहिले तरी शब्द अपुरेच पडतील. एका वाक्यात सांगायचे तर, 'झाले बहु, होतील बहु परि यासम हाच' असेच म्हणावे लागेल. गीतरामायण ऐकताना श्रोते कसे व किती तन्मय होत होते ते प्रत्यक्ष कार्यक्रम पाहणाराच सांगू शकेल. नवरसाचे दर्शन व श्रवण अनुभवताना आपण द्वापार युगात गेलो की काय असा भास होतो. काही वेळा असेही वाटते की, शास्त्रीय गायक होता होता प्रभू रामचंद्राने फडक्यांना आपल्याकडे ओढून 'माझ्याच चरित्राचा' प्रसार कर हे सांगितले की काय? भारतातील बहुभाषिक रसिकांच्याही डोळ्यांत अश्रू आलेले पाहिलेले आहेत. यावरून गीतरामायणाच्या स्वरसंगतीची महती किती लोकप्रिय झाली आहे हे प्रत्ययास येते. खडतर तपःश्चर्या, मेहनत, रियाज वगैरे गोष्टी विचारात घेतल्याशिवाय यश प्राप्त होत नाही. वाद्यवृन्दावर गाणी बसविताना प्रत्येक जण कसा

वाजवितो याकडे स्वतः जातीने लक्ष पुरवीत. मराठी पद्धतीने स्वरलेखन (नोटेशन) अतिशीघ्र गतीने लिहिण्यात श्री. फडके व श्री. डावजेकर हे दोनच सारेगम लेखनपटू आहेत. गाणे पूर्णपणे बसेपर्यंत त्यांना स्वस्थता मिळत नसे. वादनकारांना थोडा वेळ विश्रांती देताना फडके स्वतः वीत दीड वीत रुंदीच्या बाकड्यावर कसेबसे आडवे होत व पुन्हा कामाला लागत. झोपेवर व शरीरावर त्यांचा ताबा होता. थोडा रागीट स्वभाव असला तरी दुसऱ्याच क्षणात एकदम शांत होत असत. साधी राहणी, उच्च विचारसरणी त्यांची असल्याने स्वा. सावरकर आणि डॉ. हेडगेवार यांचे तत्त्वज्ञान कारणीभूत असल्याने ते हिंदुत्वनिष्ठ भक्त बनले आहेत. असे जरी असले तरी अनेक मराठी बोलपटांना दिलेल्या संगीतात त्यांचा प्रखर हिंदुत्वनिष्ठ स्वभाव कायम होता. म्हणून निधर्मी संगीत युगात ते अनेक पुरस्कारांचे मानकरी ठरले. हे कौतुकास्पद आहे. त्यांनी स्वातंत्र्यवीर सावरकरांवर अनंत अडचणींना तोंड देत बोलपट काढला आहे.

## डॉ. वसंतराव देशपांडे

'बाळांनो, तुम्ही एखादे देवाचे पद म्हणा बघू?' ह.भ.प. आकोटकर बुवांनी निरूपणानंतर समोरच बसलेल्या वसंता देशपांडे व मला आज्ञा केली. गोकुळाष्टमीचे दिवस असल्यामुळे नागपूरला बर्डीवरील बुटींच्या वाड्यात कीर्तन सुरू होते. आम्ही दोघांनी मिळून 'नरवर कृष्णा समान' हे गाऊन दाखविले. माझी व वसंताची ओळख पुढे वाढत गेली. नोकरीनिमित्त तो लाहोर वगैरेकडे गेला. मी मुंबईत आलो. खूप मेहनत करून वसंतरावांनी गाणे वाढवले. नाटकांत कामेही करू लागला. नावलौकिक झाला. 'कट्यार काळजात घुसली' या नाटकातील पदे खूप लोकप्रिय झाली. त्यांच्याकडे न पाहता जर गाणे नुसते ऐकले तर कुणी खाँसाहेब गाताहेत की काय असा भास होत होता. ताल, लय, अर्थ, स्पष्ट शब्दोच्चार यामुळे त्यांचे गाणे खूप रंगायचे. लाहोरला चांगली तालीम मिळाल्यामुळे उच्चारावर पकड बसून चौपटीतल्या ताना घेतल्या की, श्रोते मंत्रमुग्ध होत. एकदा विदर्भात खामगाव येथे त्यांची बैठक आयोजित केली होती. सकाळी ८ ला पुण्याहून स्वारी निघाली व रात्री



९ ला पोहोचली. १० वा. गाणे सुरू होऊन पहाटे ३।। ला संपले. मारवा, बागेश्री, अडाणा विशेष रंगले. प्रत्येक कार्यक्रम इमाने-इतबारे करून गात. एका लग्नप्रसंगी मुंबईला त्यांचे गाणे दादरच्या वनिता समाजाच्या हॉलमध्ये होते. लग्नाची गडबड, पाहुण्यांची ये-जा सतत असल्यामुळे गाण्याकडे कुणाचेच विशेष लक्ष नव्हते. वसंतराव म्हणाले, 'विनायकराव, आता तुम्ही श्रोते व्हा, आणि मी गवय्या होतो. नाही तर आपण आपला रियाझ समजू.' २।। तास गाऊन त्यांनी बहार उडवून दिली. स्वभाव फार लहरी होता, तरी गाण्यात कधी कसूर केला नाही. ते तबलाही उत्तम वाजवीत असत. आफ्रिकेच्या दौऱ्यावर हिराबाई बडोदेकर यांच्या बरोबर तबलजी म्हणून जाऊन आले. नाट्य संमेलनाचे अध्यक्षही होण्याचा मान त्यांना मिळाला होता.

## पं. कुमार गंधर्व

बालपणी कुमार गंधर्वांनी पं. ओंकारनाथ, अब्दुल करीम खाँ, मा. कृष्णरावसारख्या गायकांच्या हुबेहुब नकला करून लोकप्रियता मिळविली. मात्र पुढे अव्वल दर्जाच्या व स्वतंत्र पद्धतीच्या गायकीचे प्रेरक बनले. अत्यंत कुशाग्र बुद्धीच्या या गायकाने हिंदुस्थानी संगीतात एक स्वतंत्र स्थान निर्माण केले. ऋतुसंगीत, माळवा प्रांतातील लोकसंगीत व त्यांचा शास्त्रीय संगीतात चपखल वापर, राजस्थानी पद्धतीने भजने आणि निर्गुणी भजने ते अगदी तन्मयतेने गात व श्रोत्यांच्या हृदयाचा ठाव घेत. माझे जिव्हाळ्याचे मित्र श्री. बाळासाहेब बाक्रे यांच्या घरी झालेल्या कुमार गंधर्वांच्या गाण्याच्या मैफिली श्रवणीय आहेत. त्यांपैकी काही तर नेहमी ऐकल्या तरी समाधान होत नाही. तिलककामोद, यमन, गांधी मल्हार वगैरे राग परिणामकारकरीत्या गायले आहेत. पेटीवर गोविंदराव पटवर्धन आणि तंबोऱ्यावर पत्नी वसुंधरा आणि कन्या कलापिनी यांची कंठसाथ अधिकच भर घालीत. कुमारजींच्या काही स्वरचित बंदिशी ऐकण्यासारख्या असून प्रत्येक स्वर, आलाप, ताना, साचेबंद असून प्रत्येक वेळेला समेवर अगदी आत्मविश्वासाने येत. श्रोतेही, 'वाहवा! क्या बात है!' अशी उत्स्फूर्त प्रतिक्रिया देऊन पसंती व्यक्त करीत. गाताना

त्यांना शांतता हवी. एकदा गाणे चालू असताना कोणी तरी आपसात बोलत होते. कुमारांनी त्यांना स्पष्टपणे फर्मावले की, बोलायचे असेल तर बाहेर जा. 'सुनता है गुरुज्ञानी' या भजनाच्या वेळेला तर श्रोते देहभान विसरून गाण्याशी एकतानता साधत एकरूप होत असत.

## पं. जितेंद्र अभिषेकी

मूलतः आवाजाची विशेष देणगी अशी जरी नसली, तरी आहे त्याच भांडवलावर अथक मेहनत करून कमावलेल्या आवाजात आपल्या बुद्धिकौशल्याने अभिषेकी यांनी लोकप्रियता मिळविली. मुंबईत राहात असताना सकाळी तंबोऱ्यावर रियाझ सुरू असे. मध्येच थांबून ही जागा कशी वाटते ते सांगा म्हणून विचारायचे. एकदा मला बहादुरी तोडीचा विस्तार हवा होता तर त्यांनी तासभर बहादुरीतोडी ऐकविला. मी आकाशवाणीवर असताना अभिषेकी कोकणी विभागात काम करीत होते. स्वतः संस्कृत पंडितांचे सुपुत्र असल्यामुळे त्यांचे मराठी, संस्कृत शब्दोच्चार स्पष्ट होते. 'याद पियाकी आई' ही बडे गुलाम अली खाँसाहेबांची लोकप्रिय चीज मला रेडिओवर दुपारच्या बैठकीत गायची होती. अंतरा वेळेवर विसरलो. जितेंद्रजींना फोनवरून विचारले. या ओळींच्या पुढे काय? यावर त्यांनी मोठ्या आनंदाने फोनवरच गाऊन दाखविली आणि वेळ निभावून नेली. संस्कृत उच्चार स्पष्ट व शुद्ध असल्यामुळे मंगलप्रभात करता मी स्वरबद्ध केलेले श्लोक तालासुरात स्पष्ट उच्चारात गायले याचे स्मरण कायमचे राहिले आहे, त्याचप्रमाणे नाट्यगीते शास्त्रीय संगीतात बसवून नाट्यसंगीत क्षेत्रात क्रांती केली. श्री. विद्याधर गोखले, पुरुषोत्तम दारव्हेकरांसारख्या कसलेल्या नाटककारांच्या नाटकांना आकर्षक चाली देऊन लोकप्रियतेचा उच्चांक गाठला. 'या भवनातील गीत, घेई-छंद मकरंद' सारखी कठीण गाणी अत्यंत लोकप्रिय झाली. मानापमान, सौभद्र, स्वयंवर, एकच प्याला आदी नाटकांतील संगीताने एक काळ गाजविल्यानंतर नाट्यसंगीत संपते की काय? अशी चिंता वाटत होती, मात्र जितेंद्र अभिषेकी यांच्या गाण्यांनी पोकळी भरून काढून नाट्यसंगीतात नवी क्रांती घडवून पुनःर्जन्म झाला, याचे श्रेय केवळ पंडितजींनाच आहे.



## पं. पलुस्कर व पं. भातखंडे

भारतीय संगीत ग्रंथरूपाने अमर करून ठेवणाऱ्यांमध्ये पं. विष्णू दिगंबर पलुस्कर व पं. विष्णू नारायण भातखंडे यांची नावे अग्रभागी आहेत. दोघांचीही नोटेशन पद्धती जरी थोडी वेगळी असली, तरी भातखंडे पद्धती हिंदुस्थानी संगीत शिक्षण वाचायला व लिहायला सोपी आहे. पं. पलुस्कर शास्त्रींचे गाणे ऐकण्याचा योग नागपूरला आला. संगीताची प्रथम परीक्षा घेतल्यावर त्यांनी गाणे कसे गावे, रागाचा आलाप ताना घेऊन विस्तार कसा करायचा हे स्वतः गाऊन दाखवीत प्रात्यक्षिकांची सुंदर दर्शने घडविली. हा दुर्मिळ योग लाभल्याबद्दल मी स्वतःला धन्य समजतो. ह्या व्याख्यानांनंतर मुलांना प्रश्न विचारायला सांगितले मी विचारले, 'सर, ताना घेताना तुमची पगडी पडत कशी नाही?' इतर मुले हसली. पंडितजी म्हणाले, 'मुलांनो, हसू नका, याचा प्रश्न बरोबर आहे. पगडी घट्ट बसली की, पडत नाही.' तुम्ही मुलांनी घाम आला की टोपी काढून ठेवण्यास हरकत नाही. पं. भातखंडे यांची भव्य शरीरयष्टी, बंद कॉलरचा कोट, उपरणे, डोक्यावर जरीची लाल पगडी ह्यामुळे त्यांची मूर्ती डोळ्यांत भरे. पं. पलुस्कर शास्त्रींची राहणी साधी, लांब दाढी, केस यांमुळे ते तपस्वी दिसत.

## पं. पलुस्करांचे तीन शिष्य

मुंबईत सर्वप्रथम स्वतःचे घर व टेलिफोन असणारा पहिला गवय्या मी, असे अभिमानाने सांगणारे प्रो. नारायणराव व्यास यांची भेट नागपूरला १९३७ साली झाली आणि परिचय वाढत गेला. संगीत परिषदेच्या निमित्ताने देशभर फिरून शास्त्रीय संगीताचा प्रसार केला. 'ये री मोहे जा फुलवाले खंडत। राधे कृष्ण बोल' इ. गाण्यांच्या ध्वनिमुद्रिका लोकप्रिय झाल्या होत्या. नारायणरावांच्या घरी दोन तीन वेळा जेवणाचे योग आले. एकदा सकाळपासून गप्पा व गाणी झाल्यावर दुपारचे १२ वाजले, व्यासांच्या पत्नी म्हणाल्या, 'आज योग चांगला आला आहे. मध्यान्ही श्री दत्ताचे अचानक आगमन होत असते. तेव्हा तुम्ही तूप, मीठ, भात, मेतकूट खाल्ल्याशिवाय जाऊ नका'. आणि संगीत भोजन झाले.

पं. पलूस्कर शास्त्र्यांचे दुसरे शिष्य पं. विनायकबुवा पटवर्धन यांनी गंधर्व नाटक मंडळीत प्रमुख भूमिका करून शास्त्रीय गायनात ख्याल, तरानामध्ये खूप कीर्ती मिळविली. बुवांच्या बरोबर प्रवासाचेही प्रसंग आले. ते म्हणत की, 'माझ्या गळ्याला बर्फाचे पोटीस जरी बांधले तरी माझा आवाज बसत नाही.' बोलता-बोलता एकदम झोपही लागण्याची देणगी त्यांना होती. बुवांनी अनेक शिष्य तयार केले व गंधर्व महाविद्यालयाच्या शाखा अनेक ठिकाणी स्थापन केल्या. संगीत विशारद, संगीत चुडामणी वगैरे पदव्यांना सरकारी मान्यता मिळाली. त्यांनी अनेक पुस्तकेही लिहिली.

तसेच पं. विष्णू दिगंबर यांचे चिरंजीव दत्तात्रय विष्णू पलुस्कर यांनीही देशभर शास्त्रीय संगीतात खूपच नाव कमविले. अनेक ध्वनिमुद्रिकाही निघाल्या. पण त्यांच्या अकाली निधनामुळे त्यांची संगीतसेवाही दुर्दैवाने अल्पकालीन ठरली.

## डॉ. एस. एन. रातंजनकर

हिंदुस्थानी संगीताबरोबरच दक्षिणात्य व पाश्चात्त्य संगीताचे गाढे अभ्यासक डॉ. अण्णासाहेब रातंजनकर हे रागांच्या शुद्धतेचा नेहमी विचार करीत. १९३८ साली नागपूरला त्यांचे गायन सर्वप्रथम मी ऐकले. त्यांचा 'जयजयवंती' खूपच रंगला. आवाजात विशेष गोडवा नसला तरी स्वरांच्या कौशल्यामुळे बैठक रंगत असे. कोणाचे गाणे कसे आहे हे ते स्वतः सांगत, ह्यामुळे बऱ्याच कलावंतांची नाराजी त्यांनी ओढवून घेतली. असे जरी असले, तरी आपली विद्या दुसऱ्याला देण्यासाठीच आहे, याची जाणीव ठेवून ते प्रामाणिकपणे शिकवीत. एकदा मी त्यांना यमन व हिंडोल यांचे मिश्रण कसे लागते हे गाऊन दाखविले आणि मत विचारले. अनेक ग्रंथ चाळून शेवटी त्यांनी 'तुमचा प्रयत्न हा फार चांगला ' असल्याचे सांगितले. याला यमनी हिंडोल अथवा यमनाचा प्रकार हे नाव दिले. चीज नव्हती तर ते म्हणाले, 'ह्यात काय आहे? मी करून देतो'. दुसरेच दिवशी या रागाच्या दोन चीजा बांधून ऐकविल्या. मी तर आश्चर्यचकितच झालो. त्या वेळी आकाशवाणीवर चालू असलेल्या ऑडिशनचे ते परीक्षक होते. मी त्यांना व गजाननराव जोशी यांना घरी



जेवायला बोलाविले. मात्र जेवणाकडे कुणाचेच लक्ष नव्हते. नवीन राग, चीजा, बंदिशी अशा वातावरणांत दोन तास कसे निघून गेले ते कळलेच नाही. निगर्वी, साध्या व प्रामाणिक संगीततज्ज्ञ व गायक विद्वानांत त्यांची गणना करणे उचित ठरेल.

## मोगुबाई कुर्डीकर आणि श्रीमती किशोरी आमोणकर

सौजन्य, शिष्टाचार, नम्रता, शालीनता आणि आदरातिथ्य हे गुण गानतपस्विनी श्रीमती मोगुबाईंमध्ये होते. प्रदीर्घ जीवनात आलेले काटेकुटे ओलांडून खऱ्या शास्त्रीय संगीताचा पाया त्यांनी घालून दिला. ही नवोदित कलावंतांना आदर्शवत देणगीच म्हटली पाहिजे. जयपूर अत्रौली घराण्यातील कलावंतांमध्ये शालीनता व नम्रता हे गुण प्रामुख्याने दिसून येतात. अर्थात सुरश्री केसरबाई केरकरांसारखे अपवाद वगळता! माईंचे म्हणणे, कलावंताला शिकण्यासाठी हा लहान तो मोठा हा विचारही मनात आणणे योग्य नाही. शिकविणाऱ्याला नेहमी गुरुस्थानीच मानले पाहिजे. मोगुबाईंच्या गळ्याला अशी काही धार होती की, समेवर येईपर्यंत त्यांना उसंत नसे. जणू अखंड स्वरांची मालिकाच. गप्पा करताना, गाणे गुणगुणणे सुरू असताना श्री. खाप्रुमामा आले. त्याच वेळी श्री. वामनराव देशपांडेही आले. आणि ती आठवणींची बैठक अशी काही रंगली की, विचारता सोय नाही. मोगुबाईंच्या गाण्याचा ठसा किशोरी ताईंवर इतका परिणामकारकपणे ठसला आहे की, आलाप, ताना, पल्लेदारपणा, लयकारीमध्ये त्या हार जात नाहीत. खाँसाहेब अल्लादियाखाँ साहेबांच्या या शिष्या. अत्यंत दमदार पद्धतीने घराण्याची गायकी त्यांनी जिवंत ठेवली. माईंचा साधा नि निगर्वी स्वभाव डोळ्यात भरण्यासारखा आहे. मिश्र खंबावती रागातील नव्यानेच गाजलेले लोकप्रिय झालेले तसेच अनेक पुढाऱ्यांनी मान्यता दिलेले 'वन्दे मातरम्' हे राष्ट्रगीत माईंच्या गळ्यात ध्वनिमुद्रित करण्याचे ठरविल्यावर मी ते गीत शिकविण्याच्या निमित्ताने त्यांच्या घरी वारंवार जात असे. असेच एक दिवस घरी गेलो असता तीन सप्तकांतील सहजगत्या घेतलेली तान ऐकू येताच तिथेच बसून रियाझ ऐकत होतो. एका आवर्तनात दमछाटीने बसणारा आलाप किंवा तान घेण्यास कसे श्रम पडतात याची चांगलीच कल्पना येते. आणि हेच या

घराण्याचे वैशिष्ट्य आहे. मी आत जाऊन भिंतीला टेकलो. माई म्हणाल्या, 'वन्दे मातृरम्' राष्ट्रगीत जरी शिकायचे झाले तरी तुम्ही आज माझ्या गुरुस्थानी असलेल्या आसनावर बसूनच मला शिकविले पाहिजे. एवढ्या मोठ्या गायिकेने केलेला हा सन्मान पाहून माझ्यासारख्या अतिक्षुल्लक गायकाला ओशाळल्यासारखे झाले. मात्र अशा प्रकारे मोगुबाईंचा गायन रियाझ रोज थोडा तरी ऐकण्याचा योग आला, याचेच मला फार समाधान वाटले. पुढे कोलंबिया कंपनीच्या हिरव्या लेबलवर मोगुबाईंच्या गळ्यातले 'वंदेमातरम्' राष्ट्रगीताचे ध्वनिमुद्रण होऊन रेकॉर्ड बाहेर पडली. हे सर्व पाहून बाईंचे खरे स्वभावदर्शन घडले. काही दिवसांनी श्रीमती किशोरी आमोणकर या आपल्या मातोश्रींचा संगीत वारसा चालविणाऱ्या गायिकेने 'नैननमें रघुवीर' हे भैरवीतले भजन रेडिओ रेकॉर्डिंग करता इतक्या अप्रतिम प्रकारे गायिले की, ते प्रत्यक्ष ऐकल्याशिवाय कल्पना येणार नाही. माझ्या अपेक्षेबाहेर गाऊन, शिकविलेल्या जागा सुंदर प्रकारे गळ्यातून निघाल्याबद्दल मला तर समाधान वाटलेच; पण केंद्रीय नभोवाणी मंत्री डॉ. बाळकृष्ण केसकर यांनीही चालीची व किशोरीताईंच्या गळ्याची प्रशंसा केली. माता मोगुबाई व कन्या किशोरी यांच्या मैफिली ऐकणे म्हणजे कपिलाषष्ठीचा योगच म्हटला पाहिजे.

## पं. सी. आर. व्यास

रागदारीचे शुद्ध स्वरूप सर्व प्रकारे उलगडून दाखविण्याचे कसब या गायकांत असल्यामुळे त्यांची बैठक रंगत असे त्यांचा 'धानी' राग ऐकताना श्रोते तल्लीन होतात. त्यांचे अनेक शिष्य तयारीचे असून मैफिली उत्कृष्ट रंगेवितात. नवीन रागांची निर्मिती व उदार कंठाने शिष्यांना शिकविण्याचे त्यांचे औदार्य वाखाणण्यासारखे होते.



## पं. यशवंतबुवा जोशी

बुवांच्या गळ्यात मा. कृष्णराव व कुमार गंधर्व यांची छाप जाणवते. वय झाले असले तरी गाण्यातील उत्साह व तारुण्य कायम असून लयकारी, सुरावट यांचा सुंदर मेळ बुवांच्या गळ्यात पाहायला मिळतो. कोणत्याही रागातील चीज गाताना तालाशी कौशल्यपूर्ण झगडा करून समेवर उत्तम तऱ्हेने येण्याची जादू बुवांच्या बैठकीत असल्यामुळे श्रोते रंगून जातात. स्पष्ट ताना, लयकारी सरगम ही गाण्याची वैशिष्ट्ये. तबलजींशी झगडा चालू असता श्रोते आता काय होणार याचा विचार करीत, सम येईपर्यंत श्वास रोखून ऐकतात. सम आली की, सारे कसे शांत.

## पं. उल्हास कशाळकर

अल्पावधीतच अतिश्रमाने कमाविलेली विद्या सादर करून श्रोत्यांची मने जिंकण्याचे चातुर्य या तरुण गायकात आढळते. तानांची फिरत ही तालाशी लढण्यास सदैव तयार असते. ताल, सूर, लय, रागाची मांडणी, विस्तार, आलापी आणि हजरजबाबी ताना घेण्याच्या गुणामुळे त्यांचा प्रत्येक राग ख्याल, द्रुतलयीतसुद्धा श्रवणीय होतो. त्यातूनही पं. सुरेश तळवळकरांसारखा साथीला तबल्यावर असला म्हणजे, मग दुग्धशर्करा योगच समजायचा. सगळ्या घराण्यांचा अभ्यास करून उल्हासजींनी स्वतःची वेगळी ओळख कल्पकतेने करून दिलेली आहे. गोड गळा व मेहनतीने कमावलेला आवाज यामुळे फिरतीच्या तानांसह यांनी आगळेच यश संपादिले. मुंबई आकाशवाणीच्या ऑडिशन कमिटीवर असताना त्यांच्या स्वभावातील अनेक पैलूंचे दर्शन झाले. ते उद्बोधक व मनोरंजकही ठरले. कशाळकर हेही विविध तालांशी लयीने झगडणारे गायक आहेत; पण अत्यंत माधुर्याने, प्रेमाने ते स्वरमाध्यमातून स्वतःचे खरे कौशल्य दाखवितात. विदर्भातील पांढरकवड्यासारख्या खेड्यातला हा कलावंत नागपूर, पुणे, मुंबईमार्गे कलकत्त्यांत संगीत रिसर्च अकॅडमीत स्थायिक होऊन आपल्या कलेचे दान शिष्यांना देण्याचे कार्य करीत आहेत.

## पं. जसराज

यांची गानसमाधी लागली असताना ख्यालातील लयकारी, आलाप व फेक वाखाणण्यासारखी आहे. त्यांचे शास्त्रीय संगीताप्रमाणेच भक्तिसंगीतही अप्रतिम असून श्रोते भान हरपतात. श्री सत्य साईबाबांच्या दरबारात एकदा ते गाताना इतके रमून गेले की, गाणे थांबले तरी सर्व साथींसह चालू असल्याचा भास झाला होता. गाण्यातील गोडवा, कौल, श्रोत्यांनाही आपलेसे करणाऱ्या या किमयागाराचे गाणे, भजने, परिणामकारक होऊन कान तृप्त होतात. 'ओम नमो भगवते वासुदेवाय'ने तर अक्षरशः वेड लावले आहे.

## पदवीदान समारंभ

१९२९ साली व्यंकटेश थिएटरमध्ये राजे लक्ष्मणराव भोसले यांच्या हस्ते मला 'संगीत सुधाकर' ही पदवी मिळाली. त्या प्रसंगी राग श्री, गौडमल्हार, बागेश्री, पुरीया रागातील चीजा गायल्याबद्दल श्रोत्यांकडून वाहवा मिळाली आणि राजे लक्ष्मणराव भोसले यांच्या हस्ते तीन सुवर्णपदके मिळाली. जागतिक कीर्तीचे तत्त्वज्ञानी व थिऑसॉफिस्ट जे. कृष्णमूर्ती यांनी माझे गाणे ऐकून थिऑसॉफिस्ट कॉन्फरन्समध्ये बोलावले व तेथे तीन वेळा माझे 'वन्दे मातरम्'ही ऐकले व 'नॅशनल सिंगर' (राष्ट्रीय गायक) ही पदवी बहाल केली. ही घटना १९३९ सालातली आहे.

## कलावंताच्या दृष्टिकोनातून म. गांधींचे दर्शन

राष्ट्रपिता महात्मा गांधी यांच्या वर्ध्याच्या आश्रमात शेठ जमनालाल बजाज यांनी आयोजित केलेली बैठक अजूनही स्मरणात आहे. ७ ऑगस्ट १९३५, वर्धा येथील मगनवाडीच्या आश्रमात सायंकाळी प्रार्थनेच्या वेळी ठरली. १५ मिनिटे वेळ दिला होता; पण पाऊण तास कार्यक्रम झाला. मला प्रथम वाटले होते की,





गांधीजींसारख्या पुढाऱ्यांना गाण्याचे कार्यक्रम ऐकायला वेळ नसेल व आवडही नसेल; पण प्रत्यक्षात तर वेगळाच अनुभव आला. माझे गाणे त्यांना आवडले इतकेच नव्हे, तर बागेश्री, काफी राग गावयास सांगितले. रागांची माहिती आपणास कशी काय बुवा? असे विचारताच ते म्हणाले, 'सकाळ-संध्याकाळ भजने ऐकून थोडीफार माहिती झाली'. फरक त्यांनी विचारला तोही समजाविला. त्यांना, मिस स्लेड (मीराबेन), सरदार पटेल यांनाही बागेश्री फार आवडला. लहानमोठा भेदभाव न करता जी गोष्ट माहीत नाही, ती उत्सुकतेने जाणून घेण्याची त्यांची तयारी नेहमी असल्याचे दिसून आले. गाणे संपेपर्यंत त्यांचा चरखा चालू होता. मधूनमधून थांबून ते माझ्याकडे पाहात असत. त्यांनी आपल्या हस्ताक्षरात प्रशंसोद्‌गार लिहून आशीर्वाद दिला. १९४४ साली मुंबईला जुहू येथे त्यांचा मुक्काम असताना मौन धारण केले होते. माझा आणि बडे गुलाम अली खाँ साहेबांचा कार्यक्रम झाला. पुढे वंदे मातरम् स्वतंत्र भारताचे राष्ट्रगीत व्हावे, यासाठी सतत १२-१३ वर्षे मी केलेल्या प्रयत्नांना त्यांचा पूर्ण पाठिंबा तर होताच, मात्र पं. पलुस्कर शास्त्र्यांची काफी रागातील वंदे मातरम्‌ची मूळ चाल न बदलता त्यांची स्मृती म्हणून ती कायम ठेवावी असे त्यांचे मत होते. गांधीजींचा माझा दीर्घकाळ सहवास झाल्याने ते नुसते श्रोते नसून जाणकार संगीतज्ञ होते असे माझे मत झाले.

## डॉ. राजेंद्रप्रसाद

गांधीजींप्रमाणे डॉ. राजेंद्रप्रसाद यांनाही माझे गाणे ऐकविण्याचा योग आचार्य दादा धर्माधिकारी यांच्यामुळे आला. १९३९ मध्ये पावसाळ्यात त्यांचा दमा उसळल्यामुळे डॉक्टरांनी विश्रांतीचा सल्ला दिला होता. त्यामुळे अंथरुणावर पडल्या पडल्याच गाऊन कार्यक्रम केला. मी त्यांना सहज विचारले की, 'संगीताची आपणांस आवड कशी वगैरे, तर त्यांनी मला त्यांच्या लहानपणी शास्त्रीय गाणे कसे

शिकत होतो हे सांगताना एक वही मला दाखविली. त्यात रागांची सशास्त्र माहिती, लक्षणगीते वगैरे लिहिलेले आढळले आणि साश्चर्यानंद झाला. या कार्यक्रमास गंगाधरराव देशपांडे (कर्नाटक), शंकरराव देव, आचार्य दादा धर्माधिकारी इ. नेते मंडळी उपस्थित होती. येथे एक गोष्ट नमूद करावीशी वाटते. इतर संगीत मैफिलीत गाताना वाहवा, बहोत अच्छे, अहाहा, क्या बात है वगैरेचा प्रतिसाद श्रोत्यांकडून मिळतो तसा मात्र नेते मंडळीकडून मिळत नसतो. सारे वातावरण अगदी शांत व प्रसन्न, पवित्र वाटून काही वेगळीच अनुभूती मिळते. आणि ही नेते मंडळी जाणकार व रसिक असल्याचे दिसून येते.

## साहित्यसम्राट न. चिं. केळकर

पुणे येथे जिमखान्यावर 'पुष्करिणी' बंगल्यात तात्यासाहेब केळकर राहात होते. १९४१ साली संक्रांतीच्या दिवशी सकाळी त्यांच्या घरी गाण्याची बैठक झाली. सकाळचे तीन राग झाल्यावर तात्यासाहेब म्हणाले, 'बहार रागाची एखादी चीज गाल काय?' यावर मी म्हटले, 'बहार राग रात्रीचा आहे. सकाळी गाणे संगीतशास्त्राला मान्य नाही, तात्यासाहेब म्हणाले, 'अहो शास्त्र शास्त्र काय घेऊन बसलात? मला रात्रीचा राग सकाळी ऐकायचा झाला तर, तेवढ्यासाठी रात्री मी तुमच्या घरी यावे काय? अशा वेळी गायकाने शास्त्राला थोडी मुरड घालून श्रोत्यांच्या इच्छा लक्षात घेतल्या पाहिजेत.' निमंत्रित मोजक्याच स्नेह्यांना हे पटले व मीही तात्यासाहेबांच्या इच्छेला मान देऊन बहार रागातील ख्याल व द्रुतचीज गायलो. या कार्यक्रमाची सांगता अतिलोकप्रिय झालेल्या आणि तात्यासाहेबांना विशेष आवडणाऱ्या खंबावती रागातील 'वंदे मातरम्' राष्ट्रगीताने झाली. त्याआधी मुंबईला एका सभेत हेच वंदे मातरम् गीत गायलेले त्यांना आवडल्याने स्टेजवरच माझा हात धरून त्यांनी पाठीवर शाबासकी दिली होती.

राग गाण्याविषयीचे तात्यासाहेबांचे शास्त्रीय विचार जे वर व्यक्त केले. त्याचे प्रत्यंतर पुढे काही वर्षांनंतर अनुभवाला आले. पूर्वीच्या हिमाचल प्रदेशाची राजधानी मंडी शहरात उंच पर्वतावरील देवीच्या मंदिरात माझ्या गाण्याचा कार्यक्रम



झाला. ह्या प्रसंगी पहाटे ३।। वाजता भैरवी गाऊन झाल्यावर एक ९६ वर्षांचा श्रोता म्हणाला, 'मी दुर्गा राग फार वर्षांत ऐकला नाही. गाऊन मेहेरबानी कराल काय?' या श्रोत्याची आवड लक्षात घेता पहाटे मी 'दुर्गा' राग त्याच्या इच्छेला मान देऊन शास्त्रसंगत नाही तरी गायलो. त्या श्रोत्याला कमालीचा आनंद झाला. त्या क्षणी तात्यासाहेबांच्या वरील उद्गाराची आठवण झाली. अपवाद म्हणून जरी अशा घटना घडल्या, तरी कलावंताने त्याचा गांभीर्याने विचार करणे योग्यच ठरेल.

## तबलावादक पं. अल्लारखाँ

पूर्वीच्या जमान्यात अनेक प्रसिद्ध तबलावादक होऊन गेले. उस्ताद अहमदखान तिरखवाँ, विष्णू शिरोडकर, का. मु. मंगेशकर, शमसुद्दीन अहंमद, राम भोरपकर, एस. व्ही. पटवर्धन आदींना ऐकण्याचा, विशेषतः साथसंगत ऐकण्याचा लाभ मिळाला. हे माझे भाग्य समजतो. नागपूरचे बळवंतराव पांडे आणि पुण्याचे रुकडीकर यांचाही उल्लेख केला पाहिजे. पं. अल्लारखाँ या तबलावादकांच्या आठवणी मनोरंजक वाटतील. पूर्वी इंडियन स्टेट ब्रॉडकॉस्टिंग सर्व्हिसचे आजचे 'आकाशवाणी कार्यालय' स्टुडिओ बॅलर्ड पियरमधील आयर्विन हॉलमध्ये होते. मी नागपूरहून गाण्याच्या कार्यक्रमासाठी मुंबईला येत असे. अल्लारखाँजी तबलावादक म्हणून साथ करीत. एकदा मी त्यांना म्हटले, 'साबजी, गडबड मत करो, अपना साधा चलने दो'. त्यांनी उत्तम 'भरजरी ठेका' धरून साथ केली. कार्यक्रम संपल्यावर ते म्हणाले, 'दादा, मैंने कुछ गडबड किया क्या?' यावर दोघांनी एकमेकांना मिठी मारली. ६०-६५ वर्षांपूर्वीची ती घटना. अद्यापही जेव्हा भेट होत होती, तेव्हा वरील घटनेची आठवण काढीत व हसून दाद घेत असत. पं. रविशंकर यांची सतार आणि अल्लारखाँचा तबला ऐकण्याचे अनेक प्रसंग आठवले की, आपण तो कार्यक्रम पुन्हा पाहात आहोत की काय असे वाटते. ठरलेल्या वेळेत आपले कौशल्य दाखविले आणि शेवटची लोकल गाडी गाठण्याकरिता श्रोत्यांत चाललेली चुळबुळ व कुजबुज पाहून कार्यक्रम समयोचितपणा दाखवून कसा आवरता घ्यावा याची दक्षता ते घेत असत. दुसऱ्याच्या गुणाला उत्तेजन देणे ह्याची कदर ते करीत. त्यांचे तबला सोलो

(एकलवादन) ऐकणे हे पण अनोखे समाधान देणारे असे! पं. रविशंकराची सतार, पं. अलीअकबर खानची सरोद आणि पं. अल्लारखाँचा तबला हा त्रिवेणी संगम ज्यांनी पाहिला व ऐकला ते धन्यच!

## पं. पंढरीनाथ नागेशकर

अत्यंत कठीण परिश्रमातून, जिद्दीतून तयार झालेला हा कलावंत बुजुर्ग मास्तर म्हणून सर्वत्र अग्रणी. सतत तबल्याचाच ध्यास घेतलेला हा मनस्वी कलावंत. आज ८९ व्या वर्षीही क्लास, ट्युशन्स, नोकरी व्यवसाय सांभाळून शिकणाऱ्यांनासुद्धा खुल्या दिलाने कलेचे वाटप करीत आहे व संगीत कलेसाठी फार मोठे योगदान त्यांनी दिले आहे. सुपुत्र पं. विभव नागेशकर व पं. सुरेश तळवळकर, वसंतराव आचरेकर आदी शिष्य परिवार फार मोठा आहे. विभव व तळवळकरजी हे तर चांगलेच तयार झाले असून साथसंगत व स्वतंत्र तबलावादनाचे त्यांचे कार्यक्रम देश-विदेशात होत असतात. आकाशवाणीच्या सेवेत असताना बंधू श्री. श्रीपाद नागेशकर यांचा सहवास व साथसंगतही लाभली. गवय्याला 'पाहिजे तसे' वाजविण्याची त्यांची तयारी असे.

## कानडी मराठी श्रोते

बेळगावच्या लिंगराज कॉलेजमध्ये माझ्या गाण्याचा कार्यक्रम होता. उपस्थित माननीय श्रोत्यांमध्ये आकाशवाणीचे मुख्य केंद्रीय सचिव म. वा. लाड, संजीवनी मराठे होत्या. काही कन्नड विद्यार्थ्यांनी गडबड गोंधळ करून हा मराठी कार्यक्रम उधळण्याचा प्रयत्न केला. प्रा. ग्रामोपाध्ये, लाड वगैरेंनी शांतता राखण्याचा असफल प्रयत्न केला. कवयित्री संजीवनीबाई मराठे एकदम उठून रंगमंचावर आल्या आणि भाषण न करता 'शांत सागरी कशास उठविलीस वादळे' या स्वरचित काव्याची



एकच ओळ म्हटली. आणि एकदम शांतता पसरली. नंतर ५ वा सुरू झालेले गाणे रात्री ८।। पर्यंत निर्विघ्नपणे पार पडले.

## 'प्रसिद्ध साहित्यिक हेही कलावंतच !'

प्रो. ना. सी. फडके, आचार्य अत्रे, वि. स. खांडेकर, कुसुमाग्रज, वसंत बापट, मंगेश पाडगावकर, कवी अनिल, वि. भि. कोलते, सुरेश भट, शांता शेळके वगैरे साहित्यिक यांना खरे तर कलावंत म्हणूनच मान्यता संगीतक्षेत्रात जरूर द्यायला हवी. कोल्हापूरला एकदा ना. सी. फडके यांच्या घरी माझ्या गाण्याचा कार्यक्रम होता. मी वेळेवर सायंकाळी चार वाजता पोहोचलो. सर्व तयारी झाली; पण तबलजीचा पत्ताच नव्हता. तेव्हा चिडून अप्पासाहेब म्हणाले, 'वेळेवर येईल तर तो कलावंत कसला ? तुम्ही गाणे सुरू करा. मी ठेका धरतो.' असे म्हणून प्रोफेसर महाशयांनी पलंगाखाली ठेवलेला तबला काढला. सुरात लावला. आणि १-२ तास उत्तम साथ करून सर्वांना आश्चर्यचकित करून सोडले. एका प्राध्यापकाची सुप्त कला जागृत झाल्याचा आनंद वाटला. अप्पासाहेब हे स्पष्टवक्तेपणासाठी प्रसिद्ध होते. कार्यक्रमापूर्वी ते मला म्हणाले, 'गांधी-नेहरूंना तुमचे गाणे पसंत पडले म्हणून प्रो. फडक्यांनाही पसंत पडेल असे समजू नका'. मी म्हटले, 'असे मुळीच नाही. माझ्या गाण्यातले गुणदोष आपल्यासारख्या संगीत तज्ज्ञाकडून कळवण्यातच कलेत सुधारणा होईल हाच एकमेव उद्देश आहे.'

सोलापूर येथे भरलेल्या मराठी साहित्य संमेलनात ज्ञानपीठ मिळालेले श्री. वि. स. खांडेकर यांनी अध्यक्षस्थान भूषविले होते. रात्रीच्या कार्यक्रमात कोणते भावगीत गावे या विवंचनेत असता आचार्य अत्रे व अनंत काणेकर या दोघांनी एकाच वेळी विचारले की, कसल्या चिंतेत आहात तुम्ही ? मी म्हटले, 'रात्री काय गावे, या चिंतेत. अत्रे म्हणाले, 'एवढेच ना! मग खांडेकरांचेच 'घरी एकच पणती मिणमिणती' हे काव्य सुंदर रीतीने गाऊन दाखवा. हे विचार पटले आणि कार्यक्रम उत्तमरीत्या पार पडला. तसेच कल्याण येथे साहित्य संमेलन भरले असता भोजनप्रसंगी झालेल्या पंगतीत माझ्या एका बाजूला अत्रे व दुसऱ्या बाजूला प्रो.अश्वत्थामा

बाळाचार्य गजेंद्रगडकर बसले होते. अत्रे म्हणाले, 'तुमच्यावर श्लोक म्हणायची पाळी येणार आहे, तयार राहा.' मी म्हटले, 'मला श्लोकबिक काही येत नाही'. तेव्हा अत्रे म्हणाले, 'श्लोक येत नसेल तर नाटकातील एखादे पद म्हणा; पण 'येत नाही' अस कदापि म्हणू नका!' आणि मी 'कोण तुज सम सांग गुरुराया' हे पद म्हटले आणि लागलीच दत्तो वामन पोतदारांनी 'सीताकांत स्मरण जयजयराम' अशी सुरुवात करताच सर्वांनी प्रतिसाद दिला.

## देवाचिये द्वारी बसे फरशीवरी

गोव्याच्या दौऱ्यावर संत पाचलेगावकर महाराज असताना मलाही जाण्याचा योग आला. मुख्यमंत्री दयानंद बांदोडकर यांच्या एका गावात असलेल्या श्री गणेश मंदिरात माझा कार्यक्रम झाला. पेटी, तंबोरा, तबला वगैरे वाद्ये दिसली; पण बैठक अजून तयार व्हायची आहे काय? यावर मंत्रिमहोदय म्हणाले, 'देवाचिये द्वारी बसुनी फरशीवरी। सेवा करावी संगीत कलेची।।' स्वतः मंत्रिमहाशयांनी सुरेल आवाजात आरती म्हटली. नंतर गाण्याला सुरुवात झाली. गाणे संपल्यावर मला त्यांनी एक सूचना केली. गाताना किंवा मध्यतरांमध्ये चहा, कॉफी न घेता गरम पाण्यात गवती चहाची हिरवी कोवळी पाने टाकून साखर-दूध न घालता ते पाणी थर्मासमध्ये ठेवून मधूनमधून त्याचा घोट घेत जावा. म्हणजे आवाजही चांगला राहील व चहाची सवयही मोडेल आणि पित्तही होणार नाही. श्री. बांदोडकरांना शास्त्रीय गायनाची व भजनाची चांगलीच माहिती व आवड होती, असे आढळून आले.

## प्रबोधनकार ठाकरे यांच्या घरी बैठक

दादर विभागातील गोखले रोडवर राहत असलेले प्रबोधनकार केशवराव ठाकरे यांच्या घरी माझ्या गाण्याचा कार्यक्रम झाला. या कार्यक्रमाचे वैशिष्ट्य म्हणजे



रत्नागिरीच्या स्थानबद्धतेतून नुकतेच सुटून आलेले स्वातंत्र्यवीर सावरकर उपस्थित होते. तात्यांच्या बरोबर त्यांचे वडील बंधू बाबाराव आणि धाकटे बंधू डॉ. बाळ सावरकर हे तिन्ही स्वातंत्र्यवीर उपस्थित होते. कार्यक्रमाला मोजकीच निमंत्रित मंडळी होती. तीनही बंधूंचा चांगला परिचय असल्यामुळे या कार्यक्रमाला घरगुती समारंभाचे स्वरूप आले होते. बऱ्याच वर्षांच्या स्थानबद्धतेतून मुक्तता झाल्याने तात्यारावांना थकवा आला होता. तरी ते मध्यंतरापर्यंत उपस्थित राहिले. जाताजाता म्हणाले, 'संन्यस्त खड्ग या नाटकातील एखादे पद गाणार काय?' मी आनंदाने होकार दिला व 'सती जातात वीरांगना' हे पद गायलो. त्यांनी समाधान व्यक्त केले आणि झोपायला गेले. गाणे-गप्पा रात्री २ वाजता संपले. जायला निघालो तेव्हा माझ्या डोक्यावरची गांधी टोपी पाहून ठाकरे म्हणाले, 'हे शिप्तर कशाला घातलेय? टाक काढून,' असे म्हणून त्यांनीच टोपी काढून खिडकीतून फेकून दिली.

१९३०-३२ साली नागपूर येथे श्री. संत पाचलेगावकर महाराज धर्मवीर डॉ. मुंजे आणि रा. स्व. संघाचे संस्थापक डॉ. हेडगेवार यांच्या प्रमुख उपस्थितीत सकाळी माझ्या गाण्याचा कार्यक्रम झाला. गाणे संपल्यावर डॉ. साहेब म्हणाले, 'बाळ, किती छान गातोस रे तू! आवाजही छान व गोड आहे. दिसतोसही सुंदर, पण तुझ्या डोक्यावरची ही काळी फरकॅप कशी? ती विदेशी आहे. स्वदेशी टोपी घाल.' असे म्हणून त्यांनीच आपला हाताने ती काढून रस्त्यावर पेटलेल्या विदेशी कापडाच्या होळीत फेकून दिली. या घटनेचा उल्लेख श्री. गोळवलकर गुरुजींनी हेडगेवारांच्या चरित्रात आवर्जून केला आहे.

सुमारे २५-३० वर्षांपूर्वी विदर्भात मलकापूर येथे कवी 'बी' यांच्या जन्मशताब्दीनिमित्त कविसंमेलन भरले होते. अध्यक्षस्थानी कवी अनिल ऊर्फ आ. रा. देशपांडे होते. तर डॉ. वि. भि. कोलते संमेलनाचे उद्घाटक होते. श्री. सुरेश भट, मंगेश पाडगावकर आदी मान्यवर कवी उपस्थित होते. श्रोते केव्हा, कुणाला डोक्यावर घेतील व कुणा 'हुट-आऊट' करतील, याचा नेम नसतो. कवी सुरेश भट यांचे काव्यगायन चांगले चालू होते; पण मध्येच एक ओळ गायली की, कोलतेंकडे पाहून 'भाऊसाहेब' म्हणत व दुसऱ्या ओळीस अनिलांकडे पाहून 'अप्पासाहेब' असे म्हणत गाऊ लागले. याचा जरा अतिरेक झाल्यामुळे श्रोते म्हणाले, 'हे 'भाऊसाहेब, अप्पासाहेब' पुरे करा; आणि काव्यगायन करा.' मंगेश पाडगावकरांनी एक कविता गाऊन बाजी मारली व गोंधळ शांत झाला. नंतर 'मोगरा फुलला' ही कविता मी वेगळ्या चालीवर गाऊन दाखविली. श्रोत्यांनी त्यालाही प्रतिसाद दिला.

## कठीण समय येता कोण कामास येतो

१९४४ साली मुंबईला कावसजी जहाँगीर हॉलमध्ये स्वातंत्र्यवीर सावरकर यांचे व्याख्यान होते. व्याख्यान संपल्यावर 'वन्दे मातरम्' राष्ट्रगीत गाण्यास मी उभा राहिलो. गाताना 'तुमी विद्या तुमी धर्म । तुमी हरि तुमी मर्म ।' या ओळीच्या पुढची ओळ पटकन आठवेना म्हणून तीच ओळ पुन्हा पुन्हा आळवू लागलो. चाणाक्ष सावरकरांच्या लक्षात हे येताच त्यांनी मला हळूच 'त्वम्हि प्राणां शरीरे, हे शब्द सुचविले आणि मला धीर आला. जणू श्रीकृष्णाने लाज राखली आणि पुढचे संपूर्ण गीत मी निर्धास्तपणे गाऊ शकलो.

गिरगावातील सोन्या-चांदीचे व्यापारी पागनीस-पेटकर आणि मंडळीमधील पेटकर खोताच्या वाडीत राहत होते. एका रविवारी पागनीसबाई, लक्ष्मीबाई वगैरे आम्ही गायला बसलो. बाईंनी पुरिया म्हटला. मी जयजयवंती गायलो, तर विष्णुपंत पागनिसांनी 'आधी बीज ऐकले' हे पद गाऊन संध्याकाळ संगीताने रंगवून बहार उडवून दिली.

## सर माँटेग्यु बटलर आणि संगीत (मध्य प्रांताचे गव्हर्नर १९३०)

जुन्या मध्य प्रांताचे गव्हर्नर सर माँटेग्यू बटलर नागपूर या राजधानीत राहात होते. त्या वेळी गोंडाणा क्लब अनेक सरकारी अधिकाऱ्यांनी चालविला होता. या क्लबमध्ये दरवर्षी हुरडा पार्टी असे. ज्वारीच्या कोवळ्या कणसाचा हुरडा, त्याचे वडे, दही, भाजलेल्या भुईमुगाच्या शेंगा असा भरगच्च कार्यक्रम असे. क्लबच्या काही मंडळीनी एकदा पार्टीच्या दिवशी माझ्या गाण्याचा कार्यक्रम बेत आखला. या कार्यक्रमाला अध्यक्ष सर बटलर या गव्हर्नरांबरोबर सर्व सरकारी अधिकारी उपस्थित होते. हुर्ड्याच्या भिन्न रुचिदार पदार्थांची पार्टी व माझे गाणे एकाच वेळी सुरू झालं. एवढ्यात गव्हर्नर साहेब उठले व म्हणाले, 'हा तरुण गायक गात आहे. आणि आपण मात्र खात आहोत. हे बरे नाही. अर्धा तास तरी गाणे ऐकू या आणि मगच हुर्डा पार्टीचा आस्वाद घेऊ या.' सर्वांना हे पटले. नंतर सर्वांनी गाण्याचा कार्यक्रम ऐकला व मग हुर्डा पार्टीवर सर्वांनीच यथेच्छ ताव मारला. त्याआधी 'वंदेमातरम्' राष्ट्रगीत



गायलो. सर माँटेग्यु बटलर साहेबांनी उभे राहून राष्ट्रगीताला मानवंदना दिली हे विशेष.

## युरोपियनांचे कलाप्रेम

पूर्वीचे युरोपियन प्राचार्य, प्राध्यापक, शिक्षक यांचे संगीतकलेविषयींचे प्रेम कित्येक प्रसंगी मोठ्या उत्साहाने दिसून येत होते. नागपूरच्या मॉरिस कॉलेजचे प्राचार्य वेशायर यांना संगीताची आवड होती. मराठी भाषेचे ते अभिमानी होते. मराठी शिकण्यासाठी त्यांनी नाना वैद्य नावाच्या शिक्षकांची ४० रु. महिना देऊन शिकवणी ठेवली होती. मराठी वाङ्मय मंडळाच्या गाण्याच्या कार्यक्रमाला ते आवर्जून उपस्थित राहात, तर हिस्लॉप कॉलेजचे प्राचार्य गार्डनर आता मराठी गाणे म्हणा अशी फर्माईश करीत. प्राध्यापक मोझेस यांना थोडेफार मराठी येण्याचे श्रेय डॉ. शं. दा. पेंडसे आणि कवी भवानीशंकर पंडित यांचेकडे जाते. मी पटवर्धन हायस्कूलमध्ये असताना प्रमुख श्री. मॅक्नी यांनाही ही भाषा व गाणे शिकण्याची आवड होती. अमरावती येथील किंग एडवर्ड कॉलेजचे प्राचार्य टॉस्टविन हे वेळा सांभाळण्यात फार दक्ष असत. एकदा वार्षिक संमेलनात माझ्या गाण्याचा कार्यक्रम होता. रात्री १२ नंतर नियमाप्रमाणे बंद करणे भाग होत. टॉस्टविन साहेबांनी कार्यक्रम रंगलेला पाहून वेळ वाढवून दिली. आणि प्रा. डॉ. वि. भि. कोलते, प्रा. सोमलवार, यांच्या बरोबर टॉस्टविन साहेबही बसून रसग्रहण करण्यात गुंगून गेले. पूर्वीच्या मध्य प्रदेशच्या सर मॉटेग्यु बटलर यांच्या संगीतप्रेमाबद्दलचे उदाहरण आधी येऊनच गेले आहे. अशा पाश्चात्य संगीतप्रेमी, हिंदी, मराठी भाषाप्रेमी मंडळीच्या आठवणी निघाल्या की, प्रत्यक्षच मनरंजनाचे चित्र डोळ्यापुढे येऊ लागते.

## ज्युतिका रॉय

ज्यतिका रॉय ही एक काळ गाजविणारी लोकप्रिय बंगाली गायिका!

ज्युतिका रॉय मीराबाईंची भजने तन्मयतेने गाऊन रसिकांची मने आकर्षून घेई. धारदार आवाजामुळे तिच्या गाण्याला अलोट गर्दी होत असे. अत्यंत साधी राहणी व शालीन स्वभावामुळे तिला आधुनिक काळातील 'मीराबाई' या नावाने ओळखले जात असे. छुपके छुपके बोल मैना, जोगी मत जा, ही भजने गाऊन श्रोत्यांना तिने वेड लावले होते.

## शांता आपटे

सुप्रसिद्ध अभिनेत्री व गायिका शांता आपटे हिने एक काळ गाजविला. पुण्याच्या पैसा फंड मेळ्यातील कुलीन गायिका म्हणून तिने नाव कमाविले. गोड आवाज, स्पष्ट ताना, हरकती, खटके, मुरकी तान, शब्दोच्चार स्पष्ट, कठीण चाली गळ्यातून काढणे इ. वैशिष्ट्ये या गायिकेत होती. काही वेळा तर पाश्चात्त्य पद्धतीची धाटणी घेण्याचा प्रयत्न ती करी. श्रीमती आशा भोसलेंच्या धाटणीची थोडी झलक शांताबाईंमध्ये होती. स्वभाव मात्र तापट. सेंट झेवियर्स कॉलेजच्या भव्य सभागृहात एकदा गाणे होते. वेळ होऊन गेली पण 'लाऊडस्पिकर्स चालू झाल्याशिवाय मी गाणे सुरू करणार नाही. तुम्ही हजाम आहात की कोण?' वातावरण तापले. आम्ही मध्यस्थी केली. लाऊडस्पिकर्सवाल्यांनी ही माफी मागितली. नंतर लाउडस्पिकर्स सुरू होऊन वातावरण शांत झाले. छोटासा संसार हमारा हे बोलपटातील गीत गाऊन बाईंनी दोन वन्समोअर घेतले. थोडे वय वाढले होते, तरी पण स्वभाव अल्लडच होता. कार्यक्रम संपल्यावर त्या आम्हांला म्हणाल्या, 'तुम्ही होतात म्हणून आजचा कार्यक्रम निभावला'. त्यांचे बंधू बाबाराव आपटे तर अस्तन्या वर करूनच अशा प्रसंगी 'फायटिंग मूड' मध्ये असत.

## सुशीला टेंबे

'नको रे कृष्णा उडवू रंग, अंग भिजविते! मध्यरात्री चांदण्यात थंडी वाजते! हे गाणे गाताना टेंबे यांना अक्षरशः श्रोत्यांनी डोक्यावर घेतले. समोरच बसलेल्या एका सद्गृहस्थ श्रोत्याने आपल्या जवळची शाल उचलून अंगावर घेतली आणि हशा पिकला.





## स्वतंत्र भावगीत घराण्याचे जनक श्री. गजाननराव वाटवे

श्री. गजाननराव वाटवे यांचे नाव महाराष्ट्राला नवे नाही. ते दीर्घकाळ गाजत राहील. एकच गायक, एकच हार्मोनिअम व तबला या 'प्रचंड' वाद्यवृंदासह हजारो मैफिली रंगवून श्रोत्यांना अगदी संगीतमय करून टाकले. शेकडो भावगीते व काव्ये ध्वनिमुद्रित करण्याचे भाग्य मला लाभले. मंगेशकर कुटुंबीय, भीमसेन जोशी, जसराज, रविशंकर आदी महान कलावंतांनी संगीताची सेवा करून श्रोत्यांत लाखो 'कानसेन' तयार केले. संगीतात जशी अनेक घराणी आहेत, त्यात गजाननराव वाटवे यांचे स्वतंत्र भावगीत घराणे आहे, असे म्हटल्यास अतिशयोक्ती होणे नाही. नुकत्याच पुण्याला आलेल्या भेटीत बोलता बोलता वाटवे म्हणाले, 'इतक्या वर्षांचे एवढे दृढ संबंध आहेत हे जरी खरे असले, तरी आपल्यात कधीही, कोणत्याही कारणास्तव वितुष्ट आले नाही हे फार महत्त्वाचे आहे.' यांची अत्यंत साधी राहणी. एक हार्मोनियम, व्हायोलीन व तबला एवढ्याच भांडवलावर या भावगीत गायकाने उभ्या महाराष्ट्राला वेड लावले. वारा फोफावला, गगनी उगवला सायंतारा, नाखवा वल्हव, राधे सैल तुझा अंबाडा, आई, अशी शेकडो गाणी अत्यंत लोकप्रिय झाली.

## जे. एल. रानडे.

यांनीही एक काळ आपल्या गोड गळ्यातून आलेल्या भावगीतांनी गाजविला. कमीत कमी वाद्यांसह गाणी सादर करीत महाराष्ट्रात लोकप्रियता मिळविली. ध्वनिमुद्रण होण्याच्या आधी प्रत्येक गाणे नोटेशन, मात्रा वगैरेसह कागदावर लिहून तयार ठेवीत. त्यामुळे त्यांच्या गाण्याचे ध्वनिमुद्रण करणे सोपे जाई . सांगलीच्या डिस्ट्रिक्ट बोर्डाच्या सेवेतून निवृत्त झाल्यावर त्यांना वर्धा येथील

कन्याशाळेत गायनशिक्षकाची नोकरी लागली आहे. त्याच भांडवलावर चांगले चालल्यामुळे गाण्याचा अधिक रियाज करून ती कला वाढविण्याची गरज त्यांना वाटली नसावी. मी चाल दिलेले एक गाणे रेकॉर्ड करण्यासाठी रिहर्सल करायला ते रोज आठ दिवस माझ्या घरी येत असत. या आठवणींचे एक गमतीदार पत्र त्यांनी वयाच्या ९३ व्या वर्षी मला पाठविले याचे आश्चर्य व कौतुकही वाटले. गोविंद कुरवाळीकर, वाटवे, जोशी इ. भावगीत गायकांबरोबर रानड्यांचेही नाव झळकले.

## बापूराव पेंढारकर

ललित कलादर्श संगीत नाटक मंडळीचे संस्थापक कै. श्री. बापूराव पेंढारकर प्रयोग नसेल त्या दिवशी संध्याकाळी आमच्या नागपूरच्या सीताबर्डीवरील गायन शाळेत येऊन टेबलावर बसून स्वर लावायचे. अहंकार माझा, बा रे पांडुरंगा, निराधार जीवे जगता, निशिदिनी मनी धरिला इ. नाट्यपदे त्यांनीच मला शिकविली. त्यांच्या गाण्याची परंपरा श्री. भालचंद्र पेंढारकर या त्यांच्या चिरंजीवांनी अखंडपणे चालू ठेविली आहे.

## मा. दीनानाथ मंगेशकर

मानापमानमधील धैर्यधराच्या भूमिकेतील दीनानाथांचा अभिनय व गाणे अजूनही कानात घुमत आहे. उग्रमंगल आणि सावरकरांचे संन्यस्त खड्ग ही नाटकेसुद्धा खूपच गाजली. १९२४-२५ साली नागपूरला महाल भागात कावऱ्यांच्या वाड्यात गो. अ. ओगले यांचे 'महाराष्ट्र' वृत्तपत्राचे कार्यालय होते.त्याच वाड्यात अर्ध्या भागात मा. दीनानाथांची बलवंत संगीत नाटक मंडळी उतरली होती. रोज नाटकाच्या व गाण्यांच्या तालमी चालायच्या. आम्ही जवळच फडणीसांच्या वाड्यात राहात होतो. तेव्हा दीनानाथांचे गाणे तालमीच्या वेळेसच ऐकायला मिळे. मुले अंगणात खेळून दंगामस्ती करू लागली, म्हणजे सर्व मुलांना दीनानाथ हाकलून देत



असत. मी एकटाच कोपऱ्यात बसून त्यांचे गाणे ऐकत असे. त्यामुळे मला केव्हाच बाहेर घालविले नाही. त्याच सुमारास श्री. गणपतराव मोहिते यांचेही गाणे ऐकायला मिळे.

## लता मंगेशकर – स्वर्गीय संगीताचा अखंड झरा

१९४० पासून पंधरा-वीस वर्षे मी मुंबईच्या हिज मास्टर्स व्हॉईस ग्रामोफोन कंपनीत व ऑल इंडिया रेडिओत असताना श्रीमती लता मंगेशकरांनी गायलेल्या अनेक हिंदी, मराठी बोलपटातील गीतांचे, भावगीतांचे तसेच भक्तिगीतांचे ध्वनिमुद्रण करण्याचे भाग्य मला लाभले. ते दिवस, ते संगीत दिग्दर्शक, ते ऑर्केस्टा वाजविणारे कलाकार आठवले की, कित्येकदा हसू येते. आश्चर्य वाटते. त्या काळची लता आणि आजची लता, परमेश्वराने वयोमर्यादा घातली म्हणून, नाही तर आवाज - अहो आश्चर्यम्! पन्नास वर्षांपूर्वीचाच, गंधर्व लता केवढं साम्याश्चर्य! कितीही पदव्या, विशेषणं लावली तरी कमीच पडतील. कुणी तरी एका ज्येष्ठ साहित्यिक पत्रकारानं (आचार्य अत्रे असावेत) सभेत लताला 'संगीताची गायत्री' म्हणताच टाळ्यांचा प्रचंड कडकडाट झाला.

## 'कृत्रिम बर्फातलं रेकॉर्डिंग'

त्या काळचे स्टुडिओ एअर कंडिशन्ड नव्हते. रेकार्डिंगच्या वेळेस तर दारं, खिडक्या, शटर्स, पंखे सर्व बंद असायचे. सर्वजण घामाघुम होत. एक दिवस लताचे एका बोलपटातील गाण्याचे रेकार्डिंग होते. अर्धवट पावसाळ्यातील जून महिन्यातील मनस्वी उकाड्याचे दिवस. मग स्टुडिओतील हाल काय विचारता? रेकार्डिंग तर झालेच पाहिजे. या जिद्दीने मॅनेजर साहेबांना एक युक्ती सुचली. चार मोठ्या परातींमध्ये बर्फ ठेवून त्या चार कोपऱ्यात ठेवल्या. आणि कसेबसे रेकार्डिंग

पार पडले. आज तर प्रत्येक स्टुडिओ, कार्यालय सर्वच एअरकंडिशन्ड. इतके की, बाहेर पडता क्षणी घामाच्या धारा लागतात.

लताचं रेकॉर्डिंग म्हणजे आनंदी आनंद! लतातार्इंना गाणे बसवायला काहीच वेळ लागत नाही. एक-दोन वेळा ऐकले की, सगळी चाल लक्षात राहते. गाण्यातील शब्दांच्या अर्थाशी, चालीतील स्वरभावनांशी, सुहास्य मुद्रेने तर कधी कधी करुण मुद्रेने त्या स्वतःला विसरून गाण्यात तादात्म्य होतात. नव्हे, त्यांची संगीत समाधीच लागते. (बालगंधर्वांना लागत होती तशी) कधी कंटाळा म्हणून नाहीच आणि आलाच तर चेहऱ्यावर कधी दिसायचा नाही. प्रत्येक गाणे मनापासून, आनंदाने, प्रामाणिकपणाने नि उत्साहाने गाण्याचे कसब इतर कलावंतांजवळ असलेले मला तरी आठवत नाही. या गानकोकिळेने एकदा स्टुडिओत पाऊल ठेवले की, सारे वातावरण कसे प्रसन्न! जसा उषःकाल होताच चिमण्या, पाखरे, कोकिळा आपल्या मधुर मंजुळ आवाजाने पहाट झाल्याचे स्मरण साऱ्या जगाला करून देतात. संगीत दिग्दर्शक एक वेळ चुकेल, विसरेल. ऑर्केस्टा वाजविणारे कलाकार एखाद्या वेळेस इकडे तिकडे होतील; पण लता कधी विसरणार नाही. रेकॉर्डिंग इंजिनिअरपासून ते चहा देणाऱ्या पोऱ्यापर्यंत प्रत्येकाला तिच्या गाण्याचे महत्त्व नि जबाबदारी इतकी वाटे की, उद्या लताबाईंचं रेकॉर्डिंग आहे या जाणीवेने सर्व जण आपापली कामे काळजीपूर्वक करीत. एकदा काय झाले, ठराविक वेळात रेकॉर्डिंग संपवायचे होते; पण का कुणास ठाऊक? एकदा म्युझिक डायरेक्टरची चूक (अर्थात श्रोत्यांच्या दृष्टीने नगण्य); दुसऱ्यांदा आर्केस्टाची चूक, तिसऱ्यांदा रेकॉर्डिंगची टेक्निकल डिफेक्ट म्हणून चूक, अशा एकामागून एक चुका होत गेल्या. आणि लताबाई मनातून जरी संतापल्या तरी वरून मात्र अगदी शांततेने म्हणाल्या, ''डायरेक्टर साब, आप पहले सबके साथ गाना पूरा बिठाकर बादमें रेकॉर्डिंग करेंगे। मुझे दुसरे रेकॉर्डिंग के लिये जाना जरूरी है। और टाईम भी संभालना चाहिए।'' असं म्हणून लिफ्टची वाट न पाहता भराभर जिना उतरू लागलेल्या पाहताच डायरेक्टर घाबरून त्यांच्यामागे धावत येऊन म्हणाले, ''लताजी , माफ करना! अब ऐसा नहीं होगा। आप जल्दी आईये।'' पण त्या पुन्हा मागे फिरल्या नाहीत.




## असाही थोडा विनोदी स्वभाव

एखादे वेळेस रेकॉर्डिंग मशीनमध्ये बिघाड झाला, तर दुरुस्ती होईपर्यंत ५-१० मिनिटे त्या गप्पांत मजेत घालवायच्या. त्या काळी गोवा लॉटरीच्या चार आण्याच्या तिकिटांच्या जहिराती वर्तमानपत्रांत झळकायच्या. मात्र आजच्यासारख्या लॉटरीचा बाजार नव्हता. समजा, एखादे चार आण्याचे तिकीट नशिबाने लागले तर पाच हजार मिळतील, असे हवेत मनोरे बांधण्याची मला खोड होती. एकदा गमतीने लताबाई म्हणाल्या, 'मागच्या आठवड्यातले पाच हजार आणि या आठवड्यातले पाच मिळून दहा हजारांची कमाई होणार तर आता!' यावर एकच हशा व्हायचा. पन्नास वर्षांपूर्वी मुंबईच्या फोर्ट विभागात रस्त्यावर आतासारखी रहदारी अजिबात नव्हती. सगळीकडे भयावह शांतता. फक्त ट्रॅमचा खडखडाट, व्हिक्टोरियाच्या घोड्यांच्या टापांचा आवाज आणि अधून मधून टॅक्सीज धावायच्या. एकदा काय झाले, रेकार्डिंग संपले. दुपारची वेळ, एकटीने घरी जायचे म्हणजे नाना चौकातील शास्त्री हॉलमधल्या घरी इतक्या दूर जाणे म्हणजे दिव्यच. लता म्हणाली, 'घरापर्यंत सोबत येता काय?' अर्थात मी हो म्हटले आणि खाकी फाटका शर्ट, खाकी लांडी पॅन्ट, हातात लांब चाबूक आणि डोक्यावर काळा तुरा असलेली तांबडी मळकट टोपी घातलेला व्हिक्टोरियावाला सहा आण्याच्या कमाईवर बेहद खूष होऊन एकदम तयार झाला. आणि आम्ही दुपारी ३ वाजता घरी पोहोचलो. आई व इतर भावंडे वाट पाहात होतीच.

एका महत्त्वाच्या गोष्टीची प्रकर्षाने होणारी जाणीव म्हणजे कोणतेही गाणे वा चीज कोणत्याही साथीशिवाय- साथ-संगतीशिवाय दूरदर्शनच्या किंवा आकाशवाणीवर एखाद्या मुलखातीत जेव्हा लता-आशा गातात तेव्हा त्यांच्या स्वर्गीय संगीतापासून मिळणारा अननुभूत आनंद आणि हिमालयातील आध्यात्मिक आनंद यांत केवढे हे साम्य! म्हणूनच 'दिव्यत्वाची जेथे प्रचिती। तेथे कर माझे जुळती।।' हे कवी बोरकरांचे काव्य खऱ्या अर्थाने इथे सार्थ ठरते.

## माणिक वर्मा

किराणा घराण्याच्या गानहिरा हिराबाई बडोदेकर व त्यांचे बंधू सुरेशबाबू माने यांच्या जवळ माणिकबाईंचे शिक्षण झाले. आवाज गोड व तानांची फिरत स्पष्ट. त्यामुळे शास्त्रीय संगीतात तर नाव मिळालेच; पण नाट्यसंगीत, भावगीते, भक्तिगीतेही त्यांनी परिणामकारकरीत्या गाऊन अमाप लोकप्रियता मिळविली. ग.दि.मां.चे 'लावियले नंदादीपा' आणि जयकृष्ण उपाध्येकृत 'रामचंद्र मनमोहन' या गीतांचे कोलंबिया कंपनीने ध्वनिमुद्रण केले. माणिकबाईंच्या गळ्याचा धर्म पाहूनच चाली बांधल्या, बसविल्या. ध्वनिमुद्रिका प्रसिद्ध व लोकप्रिय झाली. अधूनमधून आकाशवाणीवर वाजविल्या जातात. 'तुळस तुझ्या अंगणी', 'उघड उघड पाकळी' ही माडगूळकररचित गीते आकाशवाणीच्या रेकार्डिंग खात्याकडे २-३ वर्षे वाजत होती. त्यांच्या मुलीही संगीत व नाट्यक्षेत्रांत नाव कमावून आहेत. श्री. सुधीर फडके यांची अनेक गाणी माणिकबाईंनी गायली आहेत व त्या ध्वनिमुद्रिकाही फार फार लोकप्रिय झाल्या.



## श्रीमती आशा भोसले

यांच्याबद्दल लिहिणे म्हणजे चंद्राचे चांदणे कसे आल्हाददायक आहे, याचे वर्णन करण्यासारखे आहे. लता व आशा या भगिनींनी अक्षरशः भारतभर व परदेशातही रसिकांना आपल्या सर्वगुणसंपन्न गाण्यांनी वेड लाविले. परमेश्वराने दिलेल्या गोडव्याचा पुरेपूर उपयोग करून अत्यंत परिश्रम घेऊन आजही साठी-सत्तरी उलटल्यावरही जोमाने, तितक्याच जिद्दीने व आनंदाने सर्वांना सुखावत आहेत. गदिमा रचित 'लावियले नंदादीपा' हे गीत आशाबाईंनी अत्यंत मधुर प्रकारे गायिले. मुंबई आकाशवाणीवर या गीताला चांगलीच प्रसिद्धी मिळाली. तसेच 'वीणावाणीशतमुख पाणी शंकर नाचत आहे' हे पारंपरिक भक्तिगीत मी व आशाबाईंनी मिळून द्वंद्वगीतांच्या पद्धतीने गाऊन लोकप्रियता मिळविली. दोन वर्षे आकाशवाणीवर ही रेकॉर्ड वाजत होती. मात्र कोलंबिया अथवा एच.एम.व्ही.



कंपनीकडून ही रेकॉर्ड प्रसिद्ध झाली असती तर घरोघरी ही गाणी घुमत राहिली असती. कितीही कठीण चाल असो, भावगीत, भक्तिगीत, लावणी, नाट्यसंगीत, गझल असो, तितक्याच दमदार, सुमधुर, ठसक्यात त्यांनी शेकडो पदे गायिली व जगभर प्रसिद्धी मिळविली. शूरा मी वंदिले, झाले युवती मन यासारखी पदे अत्यंत कठीण अशा ताना, खटके पण त्यातही पिता मा. दीनानाथांची सावली घेऊन त्यांनी कमाल केली. अजूनही त्या तितक्याच दमदार पद्धतीने गातात हे विशेष. परमेश्वराची देणगी असलेला गळा, अथक परिश्रम, नेहमी आनंदाने कंटाळा न करता 'एव्हररेडी' अशी कितीही विशेषणे लावली तरी ती कमीच पडतील.

सोन्याची खाण जशी असते तसे मंगेशकर कुटुंब संगीताची खाण असून लता, आशा, उषा, मीना आणि दिग्दर्शक गायक हृदयनाथ ही रत्ने या संगीताच्या खाणीतून उत्पन्न झाली असून, महाराष्ट्रालाच नव्हे तर भारताला अत्यंत भूषणास्पद आहे.



## जयमाला शिलेदार

नाट्यसंगीताला आजन्म ज्यांनी वाहून घेऊन रंगभूमी, विशेषतः गंधर्व नाट्यभूमी जिवंत ठेवली, त्यांत श्रीमती जयमाला शिलेदार यांचा सिंहाचा वाटा आहे. स्वयंवर, मानापमान, सौभद्र, मृच्छकटिक, संशयकल्लोळ इ. लोकप्रिय नाटकांतील जयमालाबाईंच्या भूमिका लोकप्रिय झाल्या असून बऱ्याच अंशाने गंधर्व संगीताचा त्यांनी जीर्णोद्धार केला. १९४४ साली त्या प्रथम मुंबईत आल्या तेव्हा त्यांचा मुक्काम मी राहात असलेल्या विजयनगरमध्येच असल्यामुळे व त्यांच्या गाण्याच्या ध्वनिमुद्रिका एच.एम.व्ही. त मी असल्यामुळे गाण्यांची तालीम व रिहर्सल घेण्यास सोपे जाई. 'फुलोर फुलला ग बाई फुलोर' हे गदिमारचित गीत दि.६-११-१९४० रोजी ध्वनिमुद्रित केले. नंतरही काही भावगीते ध्वनिमुद्रित केली असली, तरी स्वयंवर ते मानापमान, एकच प्याला, यातील जी गाणी रेकॉर्ड झाली, ती बालगंधर्वांची आठवण करून देणारी ठरली. एकदा पुण्याला मानापमान नाटक चालू असता दिवे गेले. लाऊडस्पीकर्स बंद, सर्वत्र अंधार पसरला, मात्र श्रोते शांत होते.

ताबडतोब मी विंगमध्ये जाऊन जयमालाबाईंना सांगितले की, नाटक चालूच ठेवा. पीटापर्यंत मी जाऊन आलो. अगदी छान ऐकायला येत होते, पूर्वी लाऊडस्पीकर्स नव्हते तरी बालगंधर्वांचे गाणे, थिरकवाँसाहेबांची तबल्यावरची थाप, हरिभाऊ देशपांडेंचा ऑर्गन, कादरबक्ष यांची सारंगी, भाषणे, स्वगते, अगदी स्पष्ट व पात्रांच्या मूळ आवाजात ऐकावयास मिळे. नाटक चालूच ठेवले. अर्ध्या तासांच्या खंडानंतर दिवे आले व नाटक निर्विघ्नपणे पार पडले. बालगंधर्वांची नाट्यगीते तितक्याच आकर्षकतेने आजही जिवंत ठेवण्यात कुमार गंधर्व, माणिक वर्मा, रामभाऊ गुळवणी, कृष्णराव चोणकर, पु. ल. देशपांडे यांचा मोठा वाटा आहे. गंधर्व गायकीकरिता प्रसिद्ध असलेले व वाऱ्यावरची वरात गाजवलेले श्री. लालजी देसाई हेसुद्धा बालगंधर्वांची गाणी उत्तम गात असतात.

## श्रीमती प्रभा अत्रे

किराणा घराण्याच्या या गायिका गानहिरा हिराबाई बडोदेकर व सुरेशबाबू माने यांच्या शिष्या असून शांत, गंभीर, नि प्रतिष्ठितपणा यामुळे त्यांचे गाणे रंगते. मधुर आवाज, लयकारी, उत्कृष्टपणे सरगमची पखरण, ईश्वरार्पण बुद्धीने सर्वस्वी गाण्याची पद्धत, ताना हे वैशिष्ट्य. 'कीरवाणी' हा राग मुळातच थोडा गंभीर, संथ व करुण रस उत्पन्न करणारा जरी असला, तरी प्रभाताई त्यात गोडवा उत्पन्न करून कधीही कंटाळवाणा होऊ देत नाही.

## बडे गुलाम अली खाँ

अत्यंत गोड आवाज, तीनही सप्तकांत सहजतेने फिरणाऱ्या ताना, शब्दमाधुर्य आदी गुणांमुळे लोकप्रिय झालेला हा कलावंत. फाळणीनंतर पाकिस्तानात गेले तरी तेथे त्यांचे चीज झाले नाही. पुन्हा इकडे आले. भारतीय लोक मुळातच गुणग्राहक, परधार्जिणे म्हणून प्रसिद्ध. एखादा कलाकार खरोखरच



चांगला असला, तर त्याचा इतका उदो-उदो करतील की, तो डोक्यावर बसविल्याशिवाय राहात नाहीत. आल्या आल्या प्रो. बी. आर. देवधरांनी खाँ साहेबांना काही दिवसांत त्यांचे कार्यक्रम करून तीस हजार रुपये मिळवून दिले. अर्थातच आपल्या कलेचे चीज हिंदुस्थानातच होईल, हे त्यांनी ताडले. मोरारजी देसाईंना खानसाहेब म्हणाले, 'पाकिस्तानात कलेचे चीज होत नाही. काडी-बिडीलाही महाग' अशी स्थिती आहे. तेव्हा मला व्हिसा वाढवून द्या. मी येथेच स्थायिक होतो.' बडे गुलाम अली खाँ साहेबांच्या घरासहित इच्छा अर्थातच पूर्ण झाल्यास नवल ते काय?

एकदा खाँसाहेब एच.एम.व्ही.च्या स्टडिओत आले. दुपारची शांत वेळ होती. मी पियानोवर हात फिरवीत होतो. खाँसाहेब म्हणाले, 'आंबईकर साब, मुझे एक जरज की याद आई। सुनो तो।' असे म्हणून पियानोची हार्मोनियम करून खाँसाहेबांनी दुपारी दोन वाजता गायला सुरुवात केली. हा मूड पाहून धावपळ करून सर्व वादक कलाकारांना थांबवून घेतले आणि 'याद पियाकी आये' व 'क्या करू सजनी, आए ना बालम' ह्या दोन गझला रात्री ३ वाजता रेकॉर्ड झाल्या. त्या किती लोकप्रिय झाल्या हे निराळे सांगायला नकोच. तसेच एका बैठकीत त्यांनी गायिलेला मारवा इतका उत्तम ठरला की, वाटले, मारवा गावा तर अमीर खाँ व बडे गुलाम अली यांनीच. इतकी लोकप्रियता आणि चरितार्थप्रियता मिळाली. तरी मूळ स्वभाव जाईना. एका सभेत बोलताना त्यांनी असे उद्गार काढले की, 'मैं मुसलमान हूँ। करके मुझे सिर्फ पाऊन घंटा गानेको समय दिया।' मी तेथे होतो. त्यांची समजूत घालून गैरसमज दूर करण्याचा प्रयत्न केला. इतर कोणत्याही उत्कृष्ट मुस्लिम कलावंतांनी खालच्या पातळीवर येऊन असे उद्गार काढल्याचे मला आढळून आले नाही. शेवटी गुणा पूजास्थानं... हे जरी खरे असले तरी सर्वच कलाकारांनी त्याची जाणीव ठेवली पाहिजे.

## सुरश्री केसरबाई केरकर

पूर्वीच्या पिढीमध्ये जसे प्यारासाहेब, जानकीबाई, मलकाजान (आग्रा), होऊन गेले तसे आजही अल्लादियाखाँ, केसरबाई केरकर, अब्दुल करीम खाँ, वझे बुवा, बालगंधर्व, मा. कृष्णराव, कुमार गंधर्व आदी कलाकारांनी काळ गाजविला आहे. याची साक्ष अद्यापही मोगुबाई कुर्डीकर, किशोरीताई आमोणकर देत आहेत, ही समाधानाची बाब आहे. केसरबाईंच्या गाण्याची बैठक म्हणजे दरबारी थाटाची प्रतिष्ठित बैठक. जाणते श्रोते अगदी कान लांब करून व डोळे फाडून मध्येच श्वास रोखून ऐकत. आवर्तनेच्या आवर्तने लयबद्ध. अगदी सुस्वर माध्यमातून त्या गात. बिहागडा, काफी, कानडा हे राग बाईंच्या पठडीतले. इतकी वर्षे झाली तरी 'सुखकर आई' ही काफी कानडातील चीज अद्याप कानात घुमत असल्याचा भास होतो. स्वभाव मात्र तितकाच अहंकारी, मानी व थोडा गर्विष्ठ होता. कलकत्त्याच्या दरवर्षी होणाऱ्या संगीत परिषदेच्या तारखा आयोजक लालाबाबू खन्ना हे बाईंना सोयीच्या असतील त्याच ठरवत असत. मुंबई आकाशवाणीच्या कलाकारांच्या आंदोलनाच्या वेळी त्यांच्याकडे जाण्याचे प्रसंग आले. त्या आंदोलनाच्या विरुद्धही नव्हत्या आणि अनुकूलही नव्हत्या. त्या वेळचे केंद्रीय नभोवाणी मंत्री डॉ. बाळकृष्ण केसकर यांच्या विनंतीस मान देऊन त्या सभेला उपस्थित राहिल्या. मागाहून बाईंनी माझीच कानउघडणी केली. म्हणाल्या, 'फक्त तुमच्या म्हणण्याकरिता, तुमच्याकडे पाहून मी आले व सभेला हजर झाले, तर तुम्ही माझा गळा कापला.'

केसरबाईंच्या स्वाभिमानाचे दुसरे मजेदार उदाहरण पाहा. १९४८-४९ च्या सुमारास दिल्लीच्या घटना समितीच्या सन्मान्य सभासदांपुढे 'वंदे मातरम्' राष्ट्रगीत निरनिराळ्या रागात गाण्याचा माझा कार्यक्रम केंद्रीय मंत्री न. वि. ऊर्फ काकासाहेब गाडगीळ यांनी आयोजित केला होता. सन्मान्य सभासद डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना माझी मिश्र खंबावती रागातील चाल इतकी पसंत पडली की, मधूनच उठून त्यांनी माझे अभिनंदन केले व म्हणाले, 'देशभर प्रचाराकरिता ही चाल तुम्ही तुमच्या आवाजात रेकॉर्ड करा आणि केसरबाई केरकरसारख्या बाईंना शिकवून त्यांचीही रेकॉर्ड ग्रामोफोन कंपनीतर्फे काढा.' ही सूचना पसंत पडली म्हणून मी केसरबाईंना भेटून हे राष्ट्रगीत रेकॉर्डकरिता गाण्याची विनंती केली. त्यावर सुरश्री म्हणाल्या, 'मी ख्याल गाणारी गायिका आहे, वन्दे मातरम् गाण्याकरिता नाही हे





लक्षात ठेवा. हे बाईंचे उद्गार ऐकताच मी सर्दच झालो. पुढे हेच वंदेमातरम् गीत (राष्ट्रगीत) केसरबाईंच्याच घराण्यातील सुप्रसिद्ध मोगुबाई कुर्डीकर यांनी आडेवेढे न घेता अगदी विनम्रतेने, शालीनतेने व आनंदाने गाऊन कोलंबिया कंपनीकरता हे गीत रेकार्डिंग केले. एकाच घराण्यातील दोन असामान्य गायिकांमधला हा फरक आश्चर्यकारक नव्हे काय?

## श्रीमती ज्योत्स्ना भोळे

कै. वर्तकांची 'आंधळयांची शाळा' पासून माझे घर, माहेर, मो. ग. रांगणेकरांच्या आशीर्वादपर्यंत अनेक नाटकांत कामे करून रंगभूमी व चित्रपटसृष्टी संगीताने व अभिनयाने गाजविणाऱ्या श्रीमती ज्योत्स्ना भोळे यांनी महाराष्ट्र गाजवून सोडला. आला खुशीत समींदर, माझिया माहेरा जा या व इतर भावगीतांबरोबरच 'क्षण आला भाग्याचा' बोला अमृत बोला, आदि नाट्यसंगीताने तर श्रोत्यांना वेडच लावलेल्या ज्योत्स्नाबाई ८५ वर्षांच्या झाल्या, तरी त्यांच्या आवाजातील गोडवा व लकबी कायम होत्या. कै. केशवराव यांचे बहुमोल मार्गदर्शन, स्पष्ट शब्दोच्चार, अर्थ, लय, इ. महत्त्वाच्या बाबी त्यांच्याकडूनच ज्योत्स्नाबाईंना मिळाल्या.

## केशवराव भोळे

तसा माझा केशवरावांचा लहानपणापासूनचा स्नेह; पण मुंबई आकाशवाणीवर काम करताना स्नेहसंबंध अधिक वाढला. प्रभात फिल्म कंपनीच्या बोलपटाच्या संगीतामुळे त्यांचे संगीत दिग्दर्शन जगात गाजले. वक्तशीरपणा, विनोदी

स्वभाव, निर्भीड मते मांडण्यात वाकबगार व चोखंदळपणामुळे ते अधिक गाजले. 'केशव स्मरणी' या पुस्तकात त्यांच्या विषयीचे अनेक लेख प्रसिद्ध झाले आहेत. त्यात त्यांच्या अष्टपैलूपणाची झलक वाचायला मिळेल.

## कलावंत कोणाला म्हणावे?

हा एक चर्चेचा विषय व थोडासा वादग्रस्त प्रश्न आहे. जो गातो, वाजवितो, तोच कलावंत अशी सर्वसाधारण समजूत आहे. पूर्वीच्या मानाने संगीत तज्ज्ञ, संगीतकार, कला समीक्षक हेही आता कलावंतांत समाविष्ट झाले असून वाटल्यास त्यांना पोटकलावंत म्हटले तरी हरकत नाही. काहींचा व्यवसाय भिन्न असून संगीताशी त्यांचा प्रत्यक्ष वा अप्रत्यक्ष संबंध आला असलाच पाहिजे; पण अनुभव आल्याशिवाय त्यांच्या सुप्त कला प्रकाशात येत नाही. या बाबतीत बरीच उदाहरणे देता येतील. महात्मा गांधींच्या आश्रमात त्र्यंबकशास्त्री खरे नावाचे गायक संगीताचा विभाग सांभाळून प्रार्थनेत वेगवेगळ्या रागांतील भजने गाणे शिकवत होते.

त्यामुळे गांधीजींनाही बहुतेक रागांचा परिचय झाला होता. एकदा मी गायलेला राग बागेश्री त्यांना आवडला, तर काफी, बागेश्री यांत काय फरक आहे असे विचारले होते. डॉ. राजेंद्रप्रसाद तर लहानपणी शास्त्रीय संगीत शिकले होते. त्यांनी त्यांची वहीपण मला दाखविली होती. न. वि. ऊर्फ काकासाहेब गाडगीळ हेही चांगले जाणकार होते. तात्यासाहेब केळकर हे तर दर्दी संगीततज्ञ होते. कवी अनिल ऊर्फ आ. रा. देशपांडे, संजीवनी मराठे, अनंत काणेकर, आचार्य अत्रे अशी किती तरी उदाहरणे देता येतील.

कोल्हापूरला ना. सी. फडके यांच्या घरी झालेल्या कार्यक्रमात तबलजी वेळेवर आला नाही, तर फडक्यांनी स्वतः तबला वाजवून मला साथ दिली व आपल्या अंगी असलेल्या सुप्त कलेचा आस्वाद दिला. कानाला गोड लागेल ते संगीत अशी सोपी व्याख्या आज प्रचलित असून या वर्गात हजारो श्रोते आहेत. तेव्हा गायक, गायिका, वादक हेच तेवढे कलावंत आहेत असे नसून, वर उल्लेखिलेले राजकीय पुढारी, साहित्यिक, व्यावसायिक हेसुद्धा कलावंतांच्या सदरात समाविष्ट होण्यास



हरकत नाही किंवा नसावी. सर्वच काही बालगंधर्व होत नाहीत. तर कुमार गंधर्व, छोटा गंधर्व, आणि किंचित गंधर्व हे जसे प्रकार आहेत तसे पाहिजे तर वरील मंडळींचा 'एक वेगळाच कलावंताचा प्रकार' म्हटल्यास गैर नाही.

## प्रो. बी. आर. देवधर आणि वामनराव देशपांडे

'देवधर स्कूल ऑफ इंडियन म्युझिक' ही संस्था मुंबईत गिरगावमध्ये ज्यांनी स्थापन करून शास्त्रीय संगीताला अमरता दिली, ते कै. विष्णू दिगंबर शास्त्री यांचे शिष्योत्तम प्रो. बाळकृष्ण, रा. देवधर यांनी कुमार गंधर्वांसारखा गायनातला कोहिनूर हिरा घडविला. १९३३ साली मी प्रथम नागपूरहून संगीत परिषदेसाठी आलो, तेव्हा देवधर मास्तरांनीच माझी माधवाश्रमात उतरण्याची सोय केली. संगीतज्ञ व शास्त्रोक्त संगीताचे बुजुर्ग कै. वामनराव देशपांडे यांच्या घरी मी प्रथम भेटीस गेलो. देवधर साहेबही तेथेच होते. वामनराव म्हणाले, 'तुमचे नाव मी नागपूरचा तरुण गायक म्हणून ऐकले. संगीत परिषदेत उद्या तुम्ही काय गाणार याची थोडी कल्पना दिल्यास बरे'. असे सांगताच मी त्यांच्या घरातील खिडकीत बसूनच तोडी, हिंडोल, वगैरेची झलक दाखविली. तोच मध्येच थांबवून परिषदेत तुम्ही हिंडौलच गा असे सांगितले. देवधर मास्तरांनीही आनंदाने मान्यता दिली. स्फूर्ती आली. अन् वामनराव आणि देवधर मास्तर दोघेही तंबोरा काढून हिंडौल गायले. दोघांनाही प्रथमच मी ऐकल्यामुळे त्यांच्या गाण्यातून व चर्चेतून बराच फायदा झाला. दोघांनीही संगीतावर अनेक पुस्तके लिहून शास्त्रोक्त संगीताच्या प्रचाराला मोठा हातभार लावला. १९३८-३९ मध्ये देवधर मला घेऊन अलाहाबादला संगीत परिषदेकरिता गेले होते. पुढे परिचय वाढत गेला. सर्व प्रकारच्या संगीतावर त्यांचा अभ्यास होता. तसा इंग्रजी व मराठी या दोन्ही भाषांवर त्यांचा प्रभाव होता. स्वभाव अगदी साधा, प्रेमळ, उदार असा होता. एकदा ते मिरजेला असताना मी त्यांना भेटावयास गेलो. प्रकृती बरी नसल्यामुळे पडूनच होते. इकडच्या-तिकडच्या थोड्या गप्पा झाल्यावर मी त्यांना विचारले की, सरपरदा या बिलावलच्या प्रकाराची एक चीज कोलंबिया कंपनीत मी

रेकॉर्ड केली. ती बरोबर आहे का ? रागाचे स्वरूप वगैरे विचारता ते योग्य म्हणून समाधान व्यक्त केले. ग्वाल्हेर घराण्याचे श्री. राजाभैय्या पूछवाले यांनी शिकविल्याचे समजून त्यांना आनंद वाटला. तरी पण शास्त्र-शास्त्रात, घराण्या-घराण्यात थोडा फरक असणारच, असे ते पुढे म्हणाले. मात्र सरपरदाची स्वररचना चूक नाही अशा शेरा दिल्याने मलाही समाधान वाटले. अत्यंत मेहनती व प्रसंगी तंबोरे, तबला, पेटी उचलून ठेवण्यात, सुरात लावण्यास कधी त्यांना कमीपणा वाटला नाही.

वन्दे मातरम् या राष्ट्रगीताच्या तालमीकरता मी श्रीमती मोगुबाई कुर्डीकरांकडे जात होतो. तेव्हा वामनराव देशपांडे बहुतेक वेळा हजर असत. विविध घराण्यांची गानपद्धती, रागांचे स्वरूप व एकूण समीक्षा त्यांच्याकडून ओघाने मिळत असे. त्यामुळे मला त्यांचा उपयोग झाला. मिश्र खंबावतीतील वंदेमातरम्ची चाल वामनरावांना पसंत होती. अगदी तशीच माईंच्या गळ्यात बसविली होती. मात्र पत्नीच्या आजारपणामुळे मी रेकॉर्डिंगच्या दिवशी उपस्थित राहू शकलो नाही. रेकॉर्डिंग स्थगित करता आले असते; पण संगीत विभागाचे प्रमुख श्री. रूपजी यांच्या अतिउत्साहामुळे त्याच दिवशी रेकॉर्डिंग उरकले गेले. भाटिया हॉस्पिटलमध्ये माई भेटायला येत. इतके श्रम घेऊन ऐन रेकॉर्डिंग क्षणी मी येऊ न शकल्यामुळे माईंनाही फार वाईट वाटले. वामनराव तर म्हणाले, 'संगीत दिग्दर्शकाच्या अनुपस्थितीत कोणत्याही कलावंताचे ध्वनिमुद्रण करणे सर्वस्वी चूक आहे. जाऊ द्या. हे सर्व बरोबर आहे; पण सत्तेपुढे शहाणपण काय कामाचे?

## सत्यशील देशपांडे आणि रामदास कामत

तरुण कलावंतामध्ये श्री. सत्यशील देशपांडे यांचे नाव हल्ली बरेच गाजत आहे. त्यांचे शिक्षण वडील संगीतज्ञ व बुजुर्ग समीक्षक कै. वामनराव देशपांडे यांच्याकडे झाले. तालबद्ध, लयबद्ध अशी आलापी व तानांची पद्धती यामुळे त्यांची मैफल श्रवणीय ठरते. त्यांत त्यांनी दाक्षिणात्य संगीताचा अभ्यास केला असल्यामुळे मधून मधून त्याची छाप पडलेली जाणवते. एकदा त्यांनी दक्षिणात्य संगीताची 'शंकरा



भरणम' रागातील चीज गायिली व जणू कर्नाटकी गायकी अवगत असलेला कलाकार गातो की काय असा भास झाला.

संगीत नाट्य व रंगभूमीवर एक काळ गाजवून लोकप्रियता मिळविलेले श्री. रामदास कामत यांचा पल्लेदार आवाज, तानांची लयबद्ध फेक यामुळे संगीत नाटके गर्जून जात. मानापमानमधील धैर्यधराची पदे फार कुशलतेने रंगवित. मी आकाशवाणीच्या सेवेत असताना काही संस्कृत श्लोक सकाळच्या मंगलप्रभात करता त्यांच्याकडून गाऊन घेतले. सुरेल, स्पष्ट, शब्दोच्चारामुळे ते श्रवणीय ठरले. नाटकांतील 'अभिनय व संगीत' यामुळे हा नट परिणामकारक 'वरदान' ठरला.

## श्री. गोविंद पोवळे

श्री. गोविंद कुरवाळीकर हे अल्पायुषी ठरले; पण अल्पावधीत नाव (वाटवेंच्या आधी) खूपच गाजले. नंतर श्री. गजानन वाटवे यांच्या भावगीतामुळे स्वतःच्या वेगळेपणामुळे जे कलाकार प्रसिद्ध पावले, त्यांत श्री. गोविंद पोवळे यांचे नाव बरेच गाजत आहे. सुमारे ५०-५५ वर्षांपूर्वी मी एच. एम. व्ही. मध्ये असताना त्यांची गाणी व चाली ध्वनिमुद्रित करण्याचा योग आला होता. वाटवे घराण्याच्या परंपरेतील श्री. गोविंद पोवळे, बबनराव नावडीकर, दत्ता वाळवेकर यांची गाणी ऐकताना गजानन वाटवेंचा भास होतो.

## श्री. अजय पोहनकर

श्री. अजय पोहनकर हे आज आघाडीचे कलावंत असून त्यांच्या गाण्यावर बडे गुलाम अली खाँ यांची छाया आहे. ख्याल व ठुमरी गाण्यात विशेष गोडवा असून शब्दांची फेक खाँ साहेबांसारखी आहे. जबलपूरसारख्या ठिकाणी राहिल्याने हिंदी उच्चार खासच. त्यामुळे मराठी गायक गातो असे वाटत नाही. हिंदी

शब्दोच्चाराच्या बाबतीत यांचे साम्य डॉ. वसंतराव देशपांडे यांच्याशीच होऊ शकते. आई श्रीमती सुशीलाबाई संगीताच्या डॉक्टर असून त्यासुद्धा गातात व शिकवितात. आजोबा नागपूरचे कै. बाबुराव जोशी हेही संगीतज्ज्ञ व पेटीवादक होते. लहानपणी काही दिवस गायनशाळेत मलाही त्यांच्या गुरुत्वाचा लाभ मिळाला.

## श्री. बाळासाहेब बाक्रे

माझे परममित्र, संगीतज्ज्ञ, अस्सल गाण्याचे दर्दी श्री. एम. ए. ऊर्फ बाळासाहेब बाक्रे यांच्याविषयी लिहावे तेवढे थोडेच. बालगंधर्व, कुमार गंधर्व, मा. कृष्णराव आणि पं. भीमसेन जोशी हे अत्यंत उच्च दर्जाचे कलावंत बाळासाहेबांचे जणू आराध्य दैवतच आहेत. या सर्वांच्या त्यांच्या घरी झालेल्या मैफिलीच्या कॅसेट्स आजही ऐकणारा मी एक भाग्यवंत आहे. प्रत्येक कलावंताची इत्थंभूत माहिती, घराणे, गुरू त्यांना मुखोद्गत आहे. इतकेच नव्हे, तर नाट्यसंगीत व शास्त्रीय संगीताच्या शेकडो कॅसेटचा मोठा संग्रह असून अद्यावत रेकॉर्डिंगची यंत्रणा त्यांच्या घरच्या 'स्टॉक स्टुडिओत' तयार आहे. शिक्षणाकरिता पाश्चात्त्य देशात राहूनही 'भारतीय संगीताचा अमोल ठेवा' त्यांनी जपून ठेवला आहे. त्यांच्या सुविद्य पत्नी व्यवसायाने डॉक्टर असल्या, तरी त्यांच्यासह सर्व घरच संगीतमय झाले आहे. बाळासाहेबांचे वडील कै. बापूसाहेब हेही नुसते संगीतज्ज्ञ नव्हते तर शास्त्रीय गायक होते. आई खिचडी वाढताना, स्वयंपाक करताना गंधर्वांची गाणी म्हणायची. ताना घ्यायची. असे 'सशास्त्र' भोजन होत होते. त्यांनी संगीताचा मोठा वारसा श्री. बाळासाहेबांना देऊन संगीतकलेची शान राखली हे विशेष.

## हिंदुस्थानी संगीत शिक्षणाचे आधारस्तंभ

कै. पं. एस. एन. रातंजनकर या संगीत महर्षीचे नाव घेतले की, कै. के. जी. गिंडे, पं. श्री. एस. सी. आर. भट्ट, पं. श्री. दिनकर कैकिणी, पं. व्ही. जी. जोग



वगैरे ग्वाल्हेरी गायकीचे फिरंदाज यांची नावे डोळ्यासमोर उभी राहतात. घराणे एकच; पण प्रत्येकाची मैफल रंगविण्याची पद्धत वेगळी व ऐकताना त्यांनी किती रियाज केला असेल याची चांगली कल्पना येते. ख्याल, धृपदधमार, टप्पा यांवरसुद्धा विशेष प्रभुत्व. एकदा के. जी. गिंडे व एस. सी. आर. भट्ट यांची जुगलबंदी ऐकण्याचा योग आला. खर्जातील 'न मानुंगी । मैं तो हूं । न जाएंगी', ही चीज बहारीची रंगतदार ठरली. फिरत, लढत, सरगम अगदी स्पष्ट व कठीण प्रकारे पेश करताना खऱ्या जुगलबंदीचा लाभ मिळाला. पं. दिनकर कैकिणी यांचा नारायणी हा आवडता रागही जमून गेला. या सर्वांचे गायन ऐकताना पं. रातंजनकरांची आठवण होत होती.

## पं. डी. के. दातार

गायकी अंगाने विलंबित मध्यम व द्रुत लयीमध्ये व्हायोलीन वाजविण्यात श्री. दातार यांचा क्रमांक वरचा लागतो. लयबद्ध गमक अंगाने वाजविताना दातारांनी घेतलेल्या कष्टांची कल्पना येते. माझ्या बैठकीत (पूर्ण) त्यांनी साथ करण्याचे अनेक प्रसंग लाभले. अद्यापही त्यांची दुसऱ्यापासून शिकण्यासारखे काही आहे ही वृत्ती दिसून येते.

खर्जामधील व्हायोलीनवर केलेली अप्रतिम कारवाई कल्पकतेची चांगली प्रचीती आणून देते. फिल्म डिव्हिजनमध्ये नोकरी करून दातारांनी आपली कला उत्तम प्रकारे सांभाळली आहे हे कौतुकास्पद व भूषणास्पद आहे.

## यशवंत देव

लोकप्रिय संगीतकारांमध्ये देवांचा समावेश करणे उचित ठरेल. सतारवादन, काव्यरचना, स्वररचना, गायन यामध्ये त्यांनी कीर्ती कमावली आहे. स्वभाव प्रेमळ, मनमिळाऊ व परोपकारी असल्याचा अनुभव पूर्वीच मला आला आहे. ६०-७० वर्षांच्या मुम्बई व कोलंबिया ग्रामोफोन कंपनीने काढलेल्या माझ्या

काही ध्वनिमुद्रिका (डिस्क) आज ग्रामोफोन मशीनवर वाजविता येत नाही. हे कॅसेटचे युग असल्यामुळे त्यातील काही निवडक शास्त्रीय व सुगम संगीताच्या ध्वनिमुद्रिका देवांनी कॅसेटवर रूपांतरित करून दिल्याने आज त्या कॅसेटचा उपयोग होत असून चीजा व पदे चांगली टिकून राहिली आहेत. आकाशवाणीवरच्या चांगल्या कलावंतांची निवड करून त्यांना माझ्या चाली देण्यास त्यांची मदत होत असे.

## डॉ. अशोक रानडे

सर्व प्रकारच्या व घराण्यांच्या संगीताचा अभ्यास करणारे संगीतज्ञ व समीक्षक म्हणून डॉ. रानडे यांचे नाव चांगलेच गाजले आहे. कै. गजाननराव जोशी यांच्याकडे त्यांनी संगीताची तालीम घेतली व मुंबई आकाशवाणीवरही काम केले.

## श्री. बाळासाहेब टिकेकर दांपत्य

श्री. एस. जी. टिकेकर हे व्यवसायाने जरी वकील असले, तरी चांगले गायक आहेत. सौ. सुमतीबाई यासुद्धा सुसंस्कृत व विद्वान, गोड आवाजाच्या गायिका आहेत. संस्कृत श्लोक, काव्य, रंगभूमी आदि क्षेत्रांत त्यांनी कीर्ती संपादिली असून त्यांची सूनही आजची आघाडीची गायिका आहे.

## पु. लं. नी देशाला दिलेली कलात्मक इस्टेट!

पिता पुत्राकरता व कन्येकरता पैसा, घरदार, शेती, सोने, नाणे वगैरेची इस्टेट करून ठेवतो. काही जण जवळचा पैसा देणगीरूपाने इतर संस्थांना देत असल्याची उदाहरणे समाजात नेहमी आढळतात. दुसरे चित्र असेही दिसते की, मुलगा आता मोठा झाला आहे, त्याचे तो पाहून घेईल. तो शहाणा, हुशार आहे. मात्र वाचन, मनन, चिंतन, अभ्यास आदी गोष्टींची इस्टेट सहसा कोणी ठेवत असल्याचे क्वचितच आढळते. संगीत, नाट्य, साहित्य, इत्यादी कला अवगत



असूनही त्याचा उपयोग कसा करावा हेही आजमावणे कठीण आहे. याला अपवाद नुकतेच दिवंगत झालेले महाराष्ट्राचे लाडके दैवत कै. पु. ल. देशपांडे. त्यांनी महाराष्ट्राला उदार अंत:करणाने तन मन धन एक करून भरपूर कलेची इस्टेट देऊन ठेवली आहे.

नाट्यसंगीत, साहित्याच्या रूपाने प्रत्येकाच्या घरात पु. ल. वास करीत आहेत असा भास नसून प्रत्यक्षच ते आपल्यात असल्याचे जाणवते. यामुळे ते गेलेच नाहीत असा भास मात्र झाल्याशिवाय राहात नाही. सर्वगुणसंपन्न सम्राट, अनेक पैलूंचा स्वभाव बनलेला हा कलाकार खरोखरच असामान्यच म्हटला पाहिजे. हास्य, विनोद, नकला स्वभावातच असल्यामुळेच त्यांचा सहवास कधीही कंटाळवाणा झाला नाही. अडचणीच्या वा दु:खाच्या वा निराशेच्या मन:स्थितीत जरी कुणी असलं, त्याला ५-१० मिनिटे जरी पु.ल.चा सहवास लाभला अथवा त्यांचे कुठलेही पुस्तक वाचावयास घेतले तरी सर्व वातावरण प्रफुल्ल नि उल्हासमय होते. अगदी गरीब सामान्य व्यक्तीच्या जीवनापासून ते श्रीमंत, सुखवस्तू लोकांच्या जीवनाचा सखोल बारकाईने अभ्यास केल्यामुळे साहजिकच त्यांच्या नाटकांमध्ये वास्तववादी चित्रण दिसत होते. म्हणूनच त्यांची कला, संगित, नाट्य व साहित्याच्या रूपाने घरांघरांतून पाहायला मिळते व प्रत्येकाला आपल्या कुटुंबातील कोणी तरी नाहीसा झाल्याचे वाटणे साहजिकच आहे.

मुंबई आकाशवाणीच्या माझ्या सुमारे दहा वर्षांच्या सेवेत अडीच, तीन वर्षे पु. लं. चा सहवास अविस्मरणीय ठरला आहे. कँटीनमध्ये साधा चहा जरी प्यायला गेलो तरी हास्याचे फव्वारे उडत, आमच्या ग्रुपमध्ये गजाननबुवा जोशी, केशवराव भोळे, कवी नरेंद्र शर्मा, व्ही. जी. जोग आदी मान्यवर निर्मात्या कलावंतांचा समावेश असल्यामुळे पु. ल. कोणाची केव्हा सहजगत्या उडवतील, आणि हास्याचा कल्लोळ उडेल याचा नेम नव्हता. एकदा मीनाक्षीच्या 'वसंतसेना'च्या भूमिकेतील मृच्छकटिक पाहायला मी, पु. ल. व केशवराव भोळेसह गेलो असता नाटकांतील 'शकार'पेक्षाही पु. ल. च्या कॉमेन्टस्ने आनंदाचा, प्रचंड हास्याचा लाभ मिळाला. 'धन्य धन्य हो प्रदक्षिणा सद्‌गुरुरायाची' हे पारंपरिक भक्तिगीत व चाल त्यांना इतकी आवडली की, लाल दिवा विझण्याच्या आतच दार उघडून स्टुडिओत येऊन माझे अभिनंदन केले. बालगंधर्वांच्या गाण्याच्या नकला अभिनयासहित ते हुबेहूब करीत.

एकदा माझ्यावर एका संस्थेने केलेल्या अन्यायाबद्दल काय करावे याचा सल्ला मागण्यास त्यांच्याकडे एन.सी.पी.ए.मध्ये मी गेलो असता ते म्हणाले, 'कोर्टकचेऱ्यांचा निकाल उभ्या हयातीत लागायला नाही. तुम्ही हे सर्व श्री. गोविंद तळवळकरांना सांगा'. मी म्हटले, 'तुम्हीच त्यांना फोन करून सांगा'. तर पु. ल. म्हणाले, 'फोनची गरज नाही, तुम्ही माझ्याकडून आलात! इतकेच सांगा.' मग मात्र मी श्री. तळवळकरांशी बोललो. त्याचा परिणाम अर्थातच चांगला झाला व अन्यायाविरुद्ध लेखाद्वारे वाचा फोडली.

पु. ल. बद्दल अशा किती तरी आठवणी आहेत. तो खजिना कधी न संपणारा आहे. म्हणूनच वाटते की, संगीत, कला, नाट्य, साहित्याच्या रूपाने ही देशाला व महाराष्ट्राला पु. ल. नी दिलेली इस्टेटच आहे. 'हसले मनी चांदणे' या गाण्याच्या रिहर्सलसाठी आम्ही कै. माणिक वर्मा यांच्या जुन्या शिवाजी पार्कवरील अल्ट्रा हाऊसिंग सोसायटीच्या सहाव्या मजल्यावर गेलो असता यथोचित केलेल्या स्वागतानंतर माणिकताई म्हणाल्या की, 'चार तास गाऊन जो थकवा जाणवतो त्यापेक्षा हे सहा मजले चढून जाण्याने अधिकच जाणवतो'. तर पु. ल. म्हणाले, 'खरं आहे. यापेक्षा सिंहगडावर जाऊन येणे सोपे वाटते'. आणि एकच हशा झाला.

एखाद्या चांगल्या चालीला वा गाण्याला पु. ल. नी वाहवा देऊन पसंती दर्शविली की, ते गाणे लोकप्रिय होणारच असे समीकरणच जणू ठरले होते. आकाशवाणींवर असताना पु. लं. चा सहवास संस्मरणीय ठरला. एकदा 'धन्य धन्य हो प्रदक्षिणा सद्गुरुरायाची' हे भक्तिगीत श्रीमती सुमन कल्याणपूरकर, जयवंत कुलकर्णी आदि कलावंतांनी कोरसमध्ये गायिले असता रेकार्डिंग संपते तोच पु. लं. नी चाल उत्कृष्ट असल्याबद्दल अभिनंदन करून मिठी मारली. पु. लं. च्या विनोदी स्वभावाचा एक किस्सा अनेकांना माहीत असला तरी त्यात त्यांच्या तोंडून ऐकण्यात गंमत होती. एकदा ते लंडनच्या बस स्टॉपवर 'क्यु' मध्ये उभे असताना मधेच गाण्याची लहर आली व हातवारे करून हळूहळू गाऊ लागले. तान मारताना त्यांचा हात शेजारी उभ्या असलेल्या एका आंग्ल तरुणीच्या गालाला लागलाच. चिडून जाऊन तिने व्हॉट इज धिस? म्हटले तर पु. ल. शांततेने म्हणाले, 'सॉरी! धिस इज अवर स्टाईल ऑफ इंडियन म्युझिक.' इतक्यात बस आली व ती तरुणी आत चढली व खिडकीतून हसऱ्या चेहऱ्याने हात वर करून 'बाय बाय' केला पु. लं. नीही तान घेत घेत हात वर करून प्रतिसाद दिला.





रेडिओत जातो तेव्हा जुन्या स्नेह्यांचे स्मरण होते. तुमचे नाव निघतेच. आपल्या गैरहजेरीत मंडळींना प्रेमाने स्मरण व्हावे याहून मोठी मिळकत नाही. तुम्ही तो लोभ खूप मिळविला आहे. ..... पु. लं. नी मला पाठविलेल्या पत्रातला हा उतारा.

ज्या काही व्यक्तींना पु. लं. चा सहवास लाभला असेल त्यांना असंख्य आठवणी आठवत असतील यात संशय नाही. पु. ल. गेले हेही खरे वाटतच नाही. कारण ते प्रत्येकाच्या घरात संगीत, साहित्य, नाट्य, विनोद, इ. रूपाने वावरत आहेत असेच वाटते. सुमारे पन्नास वर्षांमधील काही थोड्या आठवणी खाली देत आहे.

बऱ्याच कालावधीनंतर मला एकदा पं. रविशंकर भेटले. आनंदाच्या भरांत त्यांनी मला मिठी मारली व मजेने म्हणाले की 'मेरा बुड्ढा मिल गया.' या अर्थाच्या एका बोलपटातील गाण्याची ओळ म्हटली. स्टेशन डायरेक्टर मलिक व पु. ल. यांनी हे दृश्य पाहताच पु. ल. म्हणाले, 'अरे भाई, इनको इतना जल्दी बुड्ढा क्यों बनाते?' आणि एकच हशा पिकला. पु. ल. कितीही कामात असले म्हणजे लिहीत असले तरी आल्यागेल्याचा पाहुणचार करायला कमी करीत नसत. एकदा त्यांच्या पुण्याच्या जुन्या घरी गेलो असता ते आतून मोठ्याने म्हणाले, 'मी हा लेख पूर्ण करतो. आताच पाठवायचा आहे. जाऊ नका. बसा.' थोड्याच वेळात ते आले. श्रीमती सुनिताबाईंनी छानपैकी कॉफी आणली आणि आमच्या गप्पा सुरू झाल्या.

अशा या थोर, सर्व क्षेत्रांत कौशल्यपूर्वक आपले अस्तित्व पसरविणाऱ्या कलावंताला ही आदरांजली !

## भारत गायन समाज

पुण्याच्या भारत गायन समाजाला ९०वर्षे होऊन गेली. कै. भास्करबुवा बखले यांनी स्थापन केलेल्या संस्थेची शास्त्रीय संगीताची परंपरा बुवांचे नातू व सून - श्री. सुधीर व सौ. शैला दातार या पतीपत्नींनी अत्यंत परिश्रमपूर्वक चालू ठेवली आहेत. ग्वाल्हेर घराणे, अत्रौली, आग्रा, किराणा आदि घराण्यांची गायकी भास्करबुवांना अवगत होती.

कै. मास्तर कृष्णराव, बालगंधर्व, दिलीपचंद बेदी यांच्या गायकीने बुवांच्या जुन्या गायकी व चीजांना उजाळा मिळतो. भास्करबुवा बखले यांची गायकी प्रत्यक्ष कशी होती हा जरी वादग्रस्त प्रश्न असला तरी मा. कृष्णराव फुलंब्रीकर यांची पद्धती व चीजा ऐकून बुवांच्या गायकीला पुष्टीच मिळते तेव्हा याविषयी अधिक खोलात शिरून काही साध्य होईल असे वाटत नाही.

श्री. सुधीर दातार यांची परिणामकारक गायकी, बंदिशी, आलाप, ताना, गमक, समेवर आत्मविश्वासाने येणे हे किती कठीण आहे हे त्यांच्या परिश्रमाची साक्ष देते. सौ. शैला दातार यांचा आवाज गोड. भजने, नाट्यसंगीत, भावगीते इ. मुळे त्या प्रसिद्धीस आल्या. कोणापासून काय व किती घेऊन आपल्या गायनकलेत रस आणण्याचा प्रयत्न त्या करीत असतात.



## थोडे स्वत:संबंधी

सुरुवातीला महात्मा गांधी, डॉ. राजेंद्रप्रसाद प्रभृतींनी माझे गाणे ऐकून आशीर्वाद दिल्याचे सांगितले आहे. तसे अनेक संतांनीही आशीर्वाद देऊन कौतुक केले आहे. त्यात श्री संत पाचलेगावकर महाराज, ताजुद्दीन बाबा, तुकडोजी महाराज, गुलाब महाराज, महेश योगी, स्वामी शिवानंद, नाना महाराज तराणेकर अशा किती तरी संतांचा समावेश करता येईल.

'वंदे मातरम्' स्वतंत्र भारताचे राष्ट्रगीत झालेच पाहिजे यासाठी सतत १२-१३ वर्षे देशभर प्रचार, शांततामय आंदोलन, त्याबरोबरच ४२ च्या चळवळीतील महत्त्वाचा सहभाग, भूमिगत कार्य यांचा विसर पडता कामा नये. माझ्या या आंदोलनाला डॉ. राजेंद्रप्रसाद, सरदार पटेल, काकासाहेब गाडगीळ, डॉ. बाबासाहेब आंबेडकर, साहित्यसम्राट, न. चिं. केळकर, जागतिक तत्त्ववेत्ते जे. कृष्णमूर्ती, बॉम्बे क्रॉनिकलचे डॉ. सादुल्ला ब्रेलवी, आचार्य दादा धर्माधिकारी इत्यादी मान्यवरांकडून तसेच कॉंग्रेस, हिंदुमहासभा, अ. भा. नाट्यसम्मेलन, साहित्य संमेलनातही पाठिंबा मिळाला होता.

घटना समितीच्या सन्मान्य सभासदांनीही मान्यता दिली होती. याच 'वंदे मातरम्' राष्ट्रगीताच्या श्रीमती मोगुबाई कुर्डीकर व माझ्या ध्वनिमुद्रिका निघाल्या आहेत. सुमन कल्याणपूर, किशोरी आमोणकर, लक्ष्मीशंकर, सुधा मल्होत्रा, मालती पांडे आदी कलावंतांना गोड चाली देऊन व काही गीते त्यांच्याबरोबर मी स्वत: गाऊन रेकॉर्डस् काढल्या. मात्र खंत वाटते याची की, या ध्वनिमुद्रिका व कॅसेटस, जर एच.एम.व्ही.अथवा इतर कमर्शियल कंपन्यांनी काढल्या असत्या तर ती गाणी घरोघरी पोहोचली असती व लोकप्रिय झाली असती; त्याबरोबरच प्रसिद्ध संगीतकार व एके काळचे सहकारी श्री. दत्ता डावजेकर, श्री. सुधीर फडके, श्री. व्ही. जी. भाटकर, श्री. यशवंत देव, श्री. प्रभाकर पंडित, आदींचे सहकार्य लाभले असते; परंतु खाजगी आणि व्यक्तिगत अडचणींमुळे ते होऊ शकले नाही.

१९३४ ते १९६० पर्यंत मी स्वत: गायिलेल्या शास्त्रीय व सुगम



संगीताच्या सुमारे तीस ध्वनिमुद्रिका व कॅसेटस आजही उपलब्ध असून त्या जतन करून ठेवण्याचे महत्त्वाचे कार्य सोसायटी ऑफ इंडियन ओल्ड रेकॉर्डर्स कलेक्टर्सचे प्रमुख श्री. सुरेश चांदवणकर आणि श्री. भालचंद्र मेहेर, श्री. मुलानी व श्री. ठाकुर देसाई यांनी जबाबदारीने करून ठेवले आहे. १९३१ पासून ते १९९० पर्यंत ज्या आकाशवाणी केंद्राधिकाऱ्यांनी माझ्या संगीत कलेला, गायनाला, संगीत दिग्दर्शनाला मान्यता देऊन कौतुक केले, त्यात श्री. सी. बी. सेहना, झेड. ए. बुखारी, व्हिक्टर परणज्योती, एस. एम. मूर्ती, के. एच. मलिक, व्ही. पी. भट, के. डी. दीक्षित, श्री. मधुकर गायकवाड आदींचा आवर्जून उल्लेख करणे माझे कर्तव्य असून मी त्यांचा सदैव ऋणी राहीन, तसेच माझ्यावर अनेकदा टाइम्स ऑफ इंडिया, इकॉनॉमिक टाइम्स, इंडियन एक्सप्रेस, महाराष्ट्र टाइम्स, लोकसत्ता, सामना, तरुण भारत, लोकमत, इत्यादी वृत्तपत्रांतून श्री. मोहन नाडकर्णी, कै. रामकृष्ण बाक्रे, श्री. मा. गो. वैद्य, राम शेवाळकर, पु. ल. देशपांडे, वसंत बापट, केशवराव भोळे, कुसुमाग्रज इत्यादी प्रथितयश साहित्यिकांनी लिहिले आहे. १९३८ मध्ये वंदे मातरम् राष्ट्रगीताची मिश्र खंबावती रागातील स्वरलेखन पुस्तिका, १९९६ मधील 'वेचलेले संगीत मोती', १९९९ मधील श्री. संत पाचलेगावकर महाराजांचे चारित्र आणि सांप्रतचे हे 'मैफिली आठवताना,' अशी ही ग्रंथसंपदा होय. वयाची नव्वदी गाठली तरी मन:स्वास्थ्य ठीक आहे. मात्र शरीर थकल्यामुळे आणखी लिहिणे झाले तर पाहू. 'जियेंगे तो और गायेंगे । लिखेंगे !' दूरदर्शनवर आजवर जे कार्यक्रम, मुलाखती झाल्या, त्याचे श्रेय सर्वश्री श्री. आकाशानंद, याकुब सईद, डॉ. किरण चित्रे, श्रीमती खन्ना आदींना देणे आवश्यक आहे.

संगीत कलेच्या बाबतीत एवढे लिहूनही तिचा शेवट मात्र होऊ शकत नाही. संगीताची ही अखंड गंगोत्री पवित्र स्वरांनी व तिच्या असंख्य उपासकांनी



टिकविली आहे, म्हणूनच ती अमर झाली आहे. तिचे उपासक आणि श्रोते हेही भाग्यवान म्हटले पाहिजेत. लहानपणी आई, प्यारासाहेब, जानकीबाई, मलकाजान, जोहरबाई, केशवराव भोसले इ. कलाकारांच्या रेकॉर्डस फोनोग्राफवर वाजवून ऐकत असे. त्याबरोबरच जात्यावरच्या दळणाचा एक गोड गंभीर भाव कानावर ऐकत ऐकत पहाटेची झोप होत असे. संतांच्या ओव्या, अभंग हेही ऐकून अत्यंत समाधान होई. आता हे पर्व इतिहासजमा झाले असून ते दळणही गेले, जातेही गेले. त्याची जागा नाट्यगीते, भावगीते, भजने, बोलपट संगीत, वाद्यवृन्द इत्यादींनी घेतली असून ते अमर्याद झाले आहे. ही संगीताची 'राईस-प्लेट' जरी स्वस्त व लोकप्रिय झाली असली, तरी संगीताच्या सुग्रास भोजनाची चव काही औरच ठरली आहे. मात्र नवोदित कलावंतांनी रियाज, श्रम, जिद्द, श्रद्धा ठेवून कलोपासना केलीच पाहिजे. तरच खऱ्या अर्थाने गायक-वादक तयार होतील.



कवी बी यांच्या जन्मशताब्दी
निमित्त्याने मलकापूर येथे
झालेल्या कार्यक्रमात
कवी अनिल,
मंगेश पाडगावकर यांचे बरोबर



तत्कालीन
सांस्कृतिक मंत्री
प्रमोद नवलकर
यांचे हस्ते पुस्तक
प्रकाशन
कार्यक्रमात
श्री. सुधीर फडके
यांचे बरोबर



जेष्ठ तबलावादक
अल्लारखाँ व
पं. रविशंकर यांचे
बरोबर एका
ध्वनीमुद्रण प्रसंगी